बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे




गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक २९ | बुधवार,दि. २८ जून २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

# आज अतिमुसळधार पावसाचा इशारा

**गोंदिया :** नाशिक, पुणे आणि सातारासह विदर्भात अमरा- वती, नागपूर येथे काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर भंडारा आणि गोंदिया येथे काही ठिकाणी अतितीव्र मुसळधार पाऊसही होऊ शकेल. या काळात विदर्भामध्ये मेघगर्जनेचीही शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. मोसमी पावसाचे आगमन झाल्यानंतर पुढील दोन दिवस राज्यात सर्वदूर पावसाचा अंदाज आहे.गेली काही दिवस प्रतिक्षा असलेल्या पावसाने जिल्ह्यात दमदार हजेरी लावली असून एकूण सरासरी १०७.८ मि.मी. पाऊस पडल्याने जिल्ह्यात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. पाच तालुक्यात १०० मि.मी. पेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. पुढील काही दिवस जोरदार पावसाचे असून नागरिकांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. गोंदिया तालुका ५७.६ मि.मी., आमगाव १०६.१ मि.मी., तिरोडा ७३ मि.मी., गोरेगाव ९३.१ मि.मी., सालेकसा १२७.४ मि.मी., देवरी १४९ मि.मी., मोरगाव अर्जुनी १५३.६ मि.मी., सडक अर्जुनी १२४ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्यात एकूण सरासरी १०७.८ मि.मी. पाऊस पडला. नदी, नाले यांना पूर आला असल्यास नागरिकांनी तो ओलांडू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

यानुसार जिल्ह्यात जोरदार ते अत्यंत जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत नागरिकांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केले आहे. सर्व शासकीय यंत्रणांना सतर्क राहावे, तालुका यंत्रणांनी आपापल्या स्तरावरून नागरिकांना सूचना द्याव्यात, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहे.



मंगळवारला ६.०० वा पुजारीटोला धरणाची पाणी पातळी वाढत असल्यामुळे धरण सुस्थीतीत/ नियंत्रणाकरीता ०२ गेट ०.३० मी. ने उघडण्यात आले आहे. यामधून ४५.१८ क्युमेक ( १५९६ क्युसेक ) विसर्ग नदीपात्रात सोडण्यात आला आहे. तरी तरी नदी काठावरील गावांना तसेच नदीपात्रातून आवागमन करणाऱ्यानी सावध रहावे असे आवाहन प्रशासनाने केले.

# गेल्या तीन वर्षापासून सात्यत्याने सारस पक्ष्यांच्या संख्येत घट

## महाराष्ट्रात ३५ व मध्यप्रदेशात ४९ सारस पक्ष्यांची नोंद

**गोंदिया:** बालाघाट, भंडारा-गोंदिया जिल्ह्याच्या सीमावती भागात आढळणाऱ्या सारस पक्ष्यांचे अस्तित्त्व न्यायालयाच्या सुचनेनंतरही धोक्यात आले आहे. सेवा संस्था आणि वनविभागाने जून महिन्यात केलेल्या गणनेत महाराष्ट्रातील भंडारा-गोंदिया जिल्ह्यात ३५ आणि लगतच्या बालाघाट जिल्ह्यात फक्त ४९ सारस पक्ष्यांची नोंद झाली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत या पक्ष्यांच्या संख्येत २ ने घट झाली आहे. विशेष म्हणजे घरट्यांच्या संख्येतही गोंदिया जिल्ह्यात सातत्याने घट होतांना दिसून यत आहे. या पक्ष्यांच्या संर्वधनासाठी वन्यजीव संस्था आणि वन विभागाने पुढाकार घेण्याची गरज व्यक्त होत आहे.



वर्षनिहाय पक्षी गणनेचा आलेख...

| जिल्हा | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|
| | २०२० | २०२१ | २०२२ | २०२३ |
| भंडारा | ०२ | ०२ | ०३ | ०४ |
| गोंदिया | ४५ | ३९ | ३४ | ३१ |
| बालाघाट | ५६ | ४७ | ४५ | ४९ |
| चंद्रपूर | ०१ | -- | -- | -- |

गेल्या तीनवर्षाचा विचार केल्यास सातत्याने सारस पक्ष्यांची संख्या कमी होताना दिसून येत आहे. सारस गणनेनुसार महाराष्ट्र राज्यात ३५ तर मध्यप्रदेशात ४९ सारस पक्षी आढळले. मागच्या वर्षीच्या तुलनेत गोंदिया जिल्ह्यात ३ सारस कमी झालं तर भंडारा जिल्ह्यात १ व मध्यप्रदेशातील बालाघाट जिल्ह्यात ४ सारसांची संख्या वाढली आहे.गोंदिया जिल्ह्यात सारस संख्या कमी होणं चिंतेची बाब ठरली आहे. सारस बचावाकरीता न्यायालयाने निर्देश दिल्यानंतरही मागील वर्षीच्या तुलनेत सारस पक्ष्यांची कमी झालेली संख्या प्रशासनाच्या नियोजनातील अभाव दर्शवणारी ठरली आहे.

**गोंदिया जिल्ह्यातील घरट्यांची स्थिती**
- २०२० : ०७
- २९२१ : ०६
- २०२२ : ०३

उपवनसंरक्षक कुलराजसिंग, उपवनसंरक्षक राहुल गवई , सहायक वनसंरक्षक प्रदीप पाटील, सहायक वनसंरक्षक राजेंद्र सदगीर ,सेवा संस्थेचे अध्यक्ष सावन बहेकार तथा सारस संरक्षण प्रकल्प प्रभारी सेवा संस्था सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली गोंदिया आणि बालाघाट जिल्ह्यातील एकूण १००-१२० ठिकाणी सारस गणना करण्यात आली. गोंदिया व बाला- घाट जिल्ह्यात संस्थेचे सदस्य, स्थानिक शेतकरी व गोंदिया, बालाघाट येथील वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी यांनी गणना केली.

बाघ व वैनगंगा नदी महाराष्ट्रातील गोंदिया तसेच मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्हाला विभाजित करते. भौगोलिक दृष्टीकोणातून नदीच्या दोन्ही बाजूला जैवविविधतेत समानता पाहिली जाते. सारस पक्ष्यांना भ्रमंतीकरिता किंबहुना विश्रांतीकरिता हे स्थळ योग्य आहे. म्हणूनच जिल्ह्यात सारस पक्ष्यांचा अधिवास टिकून आहे.परंतू अधिवासाच घरटं सुध्दा कमी होऊ लागल्याच यावळी समोर आल आहे.

वर्षभरातील सारस पक्ष्यांचे विश्रांतीस्थळ, प्रजनन अधिवास, तथा भोजनासाठी प्रयुक्त भ्रमण याचा अभ्यास केला गेला.संरक्षणासाठी शेतकरी आणि स्वयंसेवी संस्थांसह प्रशासकीय पातळीवर विशेष प्रयत्न करण्याची गरज असल्याचे सेवा संस्थेचे अध्यक्ष सावन बहेकार यांनी सांगितले.

# धापेवाडा सिंचन टप्पा २ ची जुलैमध्ये तपासणी-आ.रहांगडाले



**तिरोडा:** धापेवाडा उपसा सिंचन टप्पा २ च्या विकासासंदर्भात आमदार विजय रहांगडाले यांनी नागपूर येथे विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. यावेळी त्यांनी धापेवाडा उपसा सिंचन टप्पा-२ ची १५ जुलैनंतर तपासणी करणार असल्याचे सांगितले. तसेच या प्रकल्पाचे पाणी शेतकऱ्यांना सिंचनासाठी मिळण्याचा मार्ग लवकरच मोकळा होणार असल्याचे ते म्हणाले.

शेतकऱ्यांना धापेवाडा टप्पा-२ योजनेचे पाणी लवकराम लवकर मिळवे, याकरिता दर पंधरवाड्याला मंत्रालय तसेच विभागीय स्तरावर आमदार रहांगडाले आढावा घेत असतात. याअंतर्गत विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ कार्यालयात आमदार रहांगडाले यांनी विभाग प्रमुखांसोबत आढावा बैठक घेतली. यात धापेवाडा टप्पा २ योजनेच्या पंपगृहाची स्थापत्य कामे यांत्रिकी विभागामार्फत तसेच विद्युत विभागांतर्गत कामे १५ जुलैपर्यंत कामे पूर्ण करुन तपासणी करण्यात येणार आहे. टप्पा-२, चरण-३ ची कामे राज्य तांत्रिक सल्लागार समिती नाशिक येथे प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता सादर केल्याची माहिती विभागामार्फत देण्यात आली. बोदलकसा प्रकल्पावर २०२२-२३ मध्ये १५८.४३ लाख निधीतून दुरुस्तीचे कामे प्रगतीपथावर आहे. चोरखमारा प्रकल्पावर ७९.६१ लाख निधीतून दुरुस्तीचे कामे प्रगतीपथावर असून २०२३-२४ मध्ये दोन्ही तलाव दुरुस्तीकरिता २९०.७७ कोटीचे नियोजन करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

तिरोडा तालुक्यातील मेंढा व पालडोंगरी येथे मामा तलाव दुरुस्तीकरिता २०१६ मध्ये ९५.९८ लाख कामाची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. मात्र अद्याप काम सुरु नसल्याने आमदार रहांगडाले यांनी नाराजी व्यक्त केली. यावर तातडीने निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामे त्वरित करण्यात येणार असल्याची माहिती विभागामार्फत देण्यात आली.

बैठकीला विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक राजेंद्र मोहिते, गो-सेखुर्द प्रकल्पाचे मुख्य अभियंता आशिष देवगडे, जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता प्रकाश पवार, अधीक्षक अभियंता क.सू.वेमुलकोंडा, जे.एम. गंटावार, तिरोडा उपसा सिंचन प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता अंकुर कापसे, गोंदियाच्या कार्यकारी अभियंता सोनाली सोनुले, भंडारा जलविद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता गायधने उपस्थित होते.

## प्रस्तावर केंद्र सरकारकडे पाठविला

**निमगाव (आंबेनाला) लघु प्रकल्पाच्या कामाबाबत चर्चा करण्यात आली. निमगाव प्रकल्प घळभरणी वगळता दोन्ही तीरावरील मातीकाम १९७४ ते १९८४ पर्यंत पूर्ण करण्यात आले. वनसंराक कायदा लागू झाल्यामुळे प्रकल्पाचे काम सुरु झालेले नव्हते. याचा आमदार रहांगडाले यांनी पाठपुरावा केल्यानंतर हा प्रस्ताव केंद्र सरकारच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आला.**

## पंप दुरुस्तीसाठी १० कोटींची गरज

**धापेवाडा उपसा सिंचन टप्पा-१ योजनेच्या पंप कालावधी संपल्यामुळे वारंवार कराव्या लागणाऱ्या दुरुस्तीकरिता १० ते १२ कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असल्याची माहिती आमदार रहांगडाले यांच्या निदर्शनास आणून दिली. यावर त्यांनी तातडीने संबंधित मंत्र्याकडे निधी मागणी करणार असल्याची ग्वाही दिली.**

# ३० जूनला जिल्ह्यातील शाळांमध्ये किलबिलाट

**गोंदिया, :-** जिल्ह्यात नव्या शैक्षणिक सत्राला ३० जून पासून सुरुवात होत आहे. शालेय विद्यार्थ्यांना "आनंददायी शिक्षण' या हेतूने शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सवही तेवढाच आनंददायी व्हावा यासाठी जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी पत्राद्वारे केले आहे. जिल्ह्यातील सर्व शासकीय अधिकाऱ्यांना जिल्हाधिकाऱ्यांनी पत्र लिहून शाळेत "प्रवेशोत्सव" साजरा करण्याचे आवाहन केले आहे.



बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अंतर्गत ६ ते १४ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे आवश्यक आहे. शाळा प्रवेशोत्सव अंतर्गत विद्यार्थ्यांचे आनंददायी पध्दतीने स्वागत करावयाचे आहे. ६ ते १८ वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांची १०० टक्के पटनोंदणी होण्याच्या दृष्टीकोनातून शाळेच्या पहिल्या दिवशी ३० जून २०२३ ला महसूल विभागातील सर्व अधिकारी तसेच इतर विभाग प्रमुखांनी किमान २ शाळेला भेट द्यावी. शाळा प्रारंभ दिवस चैतन्यमय आणि उत्साहवर्धक करुन शिक्षक आणि विद्यार्थ्यांना शिक्षण क्षेत्रातील गुणात्मक वाटचालीसाठी शाळा प्रवेशोत्सवाच्या निमित्ताने गती प्रदान करुया, असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

नव्याने प्रवेशित होणाऱ्या बालकांच्या स्वागतासाठी जिल्हयातील सुसज्य शाळांमध्ये मंगलमय उत्साहाच्या शैक्षणिक वातावरणात विद्यार्थ्यांना प्रवेशित करण्यात येत आहे. या शाळांमध्ये जास्तीत जास्त बालके प्रवेश घेतील याकरिता सर्वांनी सहकार्य करावे. विद्यार्थ्यांचे कौतुक व शिक्षकांना मार्गदर्शन करुन नविन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केले आहे. नविन शैक्षणिक वर्षाच्या त्यांनी सर्वांना शुभेच्छाही दिल्या.

**सर्व शाळांमध्ये प्रवेशोत्सव साजरा होणार -शिक्षणाधिकारी कादर शेख**

गोंदिया जिल्ह्यात पहिली ते बारावी पर्यतच्या सर्व मिळून १६४५ शाळा आहेत. या सर्व शाळांमध्ये प्रवेशोत्सव साजरा केला जाणार आहे. गुलाबपुष्प, रांगोळी, शाळा सजावट, गणवेश वाटप, पुस्तक वाटप, शालेय पोषण आहारात मिष्ठान्न वाटप अशा नाविन्यपूर्ण पद्धतीने शाळा प्रवेशोत्सव साजरा केला जाणार असल्याचे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सांगितले. नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना शाळेचा पहिला दिवस कायम स्मरणात राहील या दृष्टीने शाळा प्रवेशोत्सवाचे आयोजन करण्यासाठी शिक्षण विभाग उत्सुक असल्याचे शिक्षणाधिकारी म्हणाले.

# गडचिरोली जिल्ह्यात तलाठी भरतीमध्ये ओबीसी उमेदवारांवर अन्याय

**गडचिरोली :** संपूर्ण महाराष्ट्रात तलाठ्यांच्या ४६४४ जागा भरण्याची जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने प्रकाशित केली आहे. यात गडचिरोली जिल्ह्यात भरल्या जाणाऱ्या १५८ जागांपैकी पेसा क्षेत्रातून १५१ आणि पेसाविरहित क्षेत्रातून केवळ ७ पदे भरली जाणार आहेत. हा जिल्ह्यातील ओबीसी उमेदवारांवर मोठा अन्याय असून याविरोधात आंदोलन छेडण्याचा इशारा राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा.शेषराव येलेकर यांनी दिला आहे.

पेसा क्षेत्रात वर्ग ३ व ४ ची १७ संवर्गातील पदे भरताना १०० टक्के अनुसूचित जमातीच्या उमेदवारातूनच भरण्याची सूचना राज्यपालांनी ९ जून २०१४ रोजी केली होती. त्यात २९ ऑगस्ट २०१९ च्या राज्यपालांच्या अधिसूचनेनुसार सुधारणा करण्यात आली असून ती सुधारित अधिसूचना २८ फेब्रुवारी २०२३ च्या शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्र राज्यात अंमलात आली आहे. परंतु महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने पेसा क्षेत्रातील तलाठ्यांच्या १५१ जागांच्या भरतीची जाहिरात ९ जून २०१४ च्या जुन्याच अधिसूचनेनुसार प्रकाशित केली. त्यामुळे ओबीसींसह एससी, एनटी, व्हीजे, एसबीसी, इडब्ल्यूएस व खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना या पदभरतीत एकही स्थान मिळाले नाही. या प्रवर्गातील उमेदवारांवर हा फार मोठा अन्याय असल्याचे प्रा.येलेकर यांनी सांगितले.




सदर पदभरतीची जाहिरात तात्काळ रद्द करुन ती २८ फेब्रुवारी २०२३ च्या शासन निर्णयानुसार प्रकाशित करण्यात यावी, अन्यथा या विरोधात राष्ट्रीय महासंघ व इतर समविचारी संघटनांच्या वतीने जिल्ह्यात मोठे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे उपाध्यक्ष प्रा.शेषराव येलेकर, जिल्हाध्यक्ष दादाजी चुधरी, कार्याध्यक्ष विनायक बांदुरकर, उपाध्यक्ष पांडुरंग घोटेकर, सचिव प्रा.देवानंद कामडी, कोषाध्यक्ष डॉ.सुरेश लडके, जिल्हा संघटक सुरेश भांडेकर, चंद्रकांत शिवणकर, महिला जिल्हाध्यक्ष संगीता नवघडे, शहराध्यक्ष सोनाली पुण्यप्रेडिवार, युवा उपाध्यक्ष राहुल भांडेकर आदींनी शासनाला दिला आहे.

## गडबड नेमकी कुठे झाली, कोणी केली?

**२८ फेब्रुवारी २०२३ च्या शासन निर्णयानुसार पेसा क्षेत्रातील ज्या गावात अनुसूचित जमातीची लोकसंख्या २५ ते ५० टक्केपर्यंत आहे अशा गावातील १७ संवगीय पदे भरताना ५० टक्के अनुसूचित जमातीतून, ६ टक्के अनुसूचित जातीतून, ९ टक्के इतर मागास प्रवर्गातून ६ टक्के विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातून, ५ टक्के आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून तर २४ टक्के खुल्या प्रवर्गातून भरण्याचे निर्देश आहेत. तर ज्या गावात अनुसूचित जमातीची लोकसंख्या २५ टक्केपेक्षा कमी आहे अशा गावातील १७ संवर्ग पदे भरताना २५ टक्के अनुसूचित जमातीतून, १० टक्के अनुसूचित जातीतून, १४ टक्के इतर मागास प्रवर्गातून, १० टक्के विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातून, ७ टक्के आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून तर ३४ टक्के खुल्या प्रवर्गातून भरण्याचे निर्देश आहे. असे असताना ९ जून २०१४ च्या जुन्या अधिसूचनेनुसार जाहिरात काढण्याचे कारण काय? यात काही राजकीय षडयंत्र तर नाही ना? अशा प्रकारची चूक महाराष्ट्र शासनाच्या वन व महसूल विभागातर्फे कशी काय होऊ शकते? असा सवाल ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा.शेषराव येलेकर यांनी केला आहे.**

# धोकादायक पुलावर अवजड वाहनांना ब्रेक लावणार तरी कधी भाऊ?

## बाघ नदीवरील पूल झाला जीर्ण: धोका कायम तरी अवजड वाहने सुसाट

**सालेकसा:** सालेकसा-आमगाव राज्य महमार्ग क्र.३३५ वरील बाघ नदीवर ४५ वर्षापुर्वी बांधलेल्या पुलावरुन क्षमतेपेषा अधिक अवजड वाहनांची ये-जा वर्दळ वाढली आहे. तर दुसरीकडे पुलाला अनेक ठिकाणी भेगा पडल्या आहेत. अशात हा पूल केव्हाही कोसळून मोठा अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. अवजड वाहनांना या पुलावरुन ये-जा करण्यास प्रतिबंध लावण्याची गरज आहे. परंतु या अवजड वाहनांना ब्रेक कोण लावणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. बाघ नदीवरील हा पूल आमगाव-सालेकसा तालुक्यासह मध्यप्रदेश आणि छत्तीसगड राज्यांनासुद्धा महाराष्ट्राशी जोडतो. जेव्हा पुलाचे बांधकाम झाले, तेव्हा या मार्गावर धावणाऱ्या वाहनांची संख्या फारच कमी होती. त्यातच दहाचाकीच्यावर कोणतीच अवजड वाहने धावत नव्हती.

आता वेगवेगळ्या वाहनांसह मोठ्या ट्रकची संख्याही वाढली. १४ चाकीपासून ४९ चाकी ट्रक मोठ्या प्रमाणावर २४ तास या मार्गावर धावतात. गेल्या १० वर्षापासून या पूलावरुन जड वाहनांची संख्या खूपच जास्त वाढली आहे. ओव्हरलोड ट्रकही सतत धावत आहेत. ४५ वर्षांपुर्वी वाहनांच्या क्षमतेनुसार हा पूल तयार करण्यात आला होता. मात्र आता या पूलाच्या क्षमतेपेक्षा जास्त वजनाची वाहने या पूलावरुन ये-जा करीत असल्याने पूलाची अवस्था बिकट झाली आहे.

पूलाच्या खालच्या भागात खड्डे, भेगा पडल्या आहेत. पूलावर खड्डे पडले आहेत. पाण्याचा योग्य निचरा होत नसल्याने पावसाच्या काळात या पूलाच्या दोन्ही बाजूला पाणी साचलेले असते. त्यामुळे मोठे वाहन जात असताना धोका वाढतो.



### स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये पूल अवजड वाहतुकीसाठी धोकादायक

**पूलाचा दर्जा आणि पूलाच्या क्षमतेबाबत १५ मे २०१८ रोजी याचे स्ट्रक्चरल ऑडिट व्हीएनआयटीने केले होते. त्यात त्यांनी या पूलावरील अवजड वाहनांची वाहतूक त्वरित बंद करावी व या पुलावरुन सुरु होणारी अवजड वाहनांची वाहतूक पर्यायी मार्गाने वळवावी. असा अह-वाल सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा प्रशासनाला दिला होता.**

### टोल वाचवण्यासाठी या मार्गाचा उपयोग

**देवरी येथील तपासणी नाका आणि टोल वाचवण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ रतील रायपूर-नागपूर दरम्यान चालणारे ट्रक व इतर जड वाहने डोंगरगड-सालेकसा-आमगाव-गोंदिया या मार्गाने जातात.**

### जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही वाहतूक सुरुच

**नागरिकांच्या सार्वजनिक सुरक्षेची जाणीव ठेवून मोटार वाहन अधिनियम १९८८ कलम ११५ नुसार आमगाव-सालेकसा राज्य महामार्ग ३३५ वरील साखरीटोलाजवळील पुलाची गंभीर स्थिती लक्षात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांना मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन १३ मार्च २०२३ रोजी या पुलावरुन जड वाहनांची वाहतूक तात्काळ बंद करण्याचे आदेश जारी केले होते. त्यानंतर या पुलावरील वाहतूक जड वाहनांसाठी बंद करण्यात आली होती. मात्र काही दिवस लोटत नाही तोच या पूलावरुन अवजड वाहनांची वाहतूक सातत्याने सुरु आहे.**

# आधारकार्डमध्ये पत्ता बदलताय मग विजबिल नको, आमदाराचेच पत्र हवे

## गोंदियातील सीसीएस केंद्राचा प्रताप

**गोंदिया:-** UIDAI ने आधार कार्डावर पत्ता बदलण्याच्या नियमांमध्ये काही प्रमाणावर सूट दिली होती. पण आता नियमांमध्ये काही बदल केले आहेत. यापूर्वी ओळखीचा पुरावा सादर केल्याशिवाय आधार कार्डावरील पत्ता बदलणे शक्य होते. पण आता आधार कार्डावरील पत्ता बदलण्यासाठी अ‍ॅड्रेस प्रूफ असणे अत्यंत आवश्यक असणार आहे. पत्त्याच्या पुरावा सादर केल्याशिवाय पत्ता बदलता येणार नाही. त्यामुळे पत्ता बदलण्यापूर्वी पत्त्याच्या पुरावा सादर करावा लागणार असले तरी आधारकार्ड जिल्ह्यात मात्र विज बिल नाकारण्याच प्रमाण वाढले असून जिल्हा प्रकल्प व्यवस्थापकांचे कंद्रावर नियंत्रण नसल्याचे दिसून येत आहे.

आधार कार्डवर नाव/पत्ता बदलण्यासाठी ३२ कागदपत्रे आवश्यक करण्यात आली आहेत. यामध्ये आमदार, खासदार, नगरसेवकाच्या पत्रासह इलेक्ट्रिक बिल(३ महिन्यापुर्वीचे नसावे) हे सुध्दा ग्राह्य धरण्यात आले आहे. परंतु गोंदियाच्या काही सीसीएस केंद्रावर पत्ता बदल करण्याकरीता इलेक्ट्रिक बिल घेऊन जाणाऱ्या नागरिकांना त्रास देत बिल नाकारले जात असून आमदाराचे पत्र आणण्यास सांगितले जात आहे. जेव्हा की आधारच्या पत्ता बदलच्या ३२ कागदपत्रामध्ये २० व्या क्रमांकावर इलेक्ट्रीक बिलचा उल्लेख केलेला आहे. यूआयडीएआयने ज्या ३२ कागदपत्रांचा उल्लेख केला आहे, जे आधार अपडेट करण्यासाठी ग्राह्य धरली जातील. यातील एक कागदपत्र तरी असणे आवश्यक आहे, मात्र गोंदिया जिल्ह्यातील सीसीएस केंद्रावर एकप्रकारे त्रास देण्याचे काम सुरु असून जिल्हाप्रशासनाचे त्याकडे दुर्लक्ष असल्याने नागरिकांना हेलपाटे खावे लागत आहेत.

### पत्ता बदलण्याकरीता तीन महिन्याच्या आतील वीजबिल ग्राह्य-जिल्हाधिकारी

**आधार कार्ड अ‍ॅपडेट करिता पोर्टलवर दिलेल्या यादीतील मुद्दा क्र.१९ नुसार विहित नमुन्यातील आमदारचे प्रमाणपत्र तर मुद्या क्रं. २० नुसार तीन महिन्याच्या आतील वीज बिल ग्राह्य असल्याचे जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी सांगितले.**

### पत्ता बदलण्यासाठी खालील कागदपत्र ग्राह्य

**पासपोर्ट, बँक स्टेटमेंट/पासबुक, पोस्ट ऑफिसच्या अकाउंटचे स्टेटमेंट किंवा पासबुक, शिधापत्रिका, मतदान ओळखपत्र, वाहन चालवण्याचा परवाना, वीज बिल, पाणी बिल, वीज बिल (अलिकडच्या ३ महिन्यातील) यापैकी कोणतीही कागदपत्रं पत्ता बदलण्यासाठी चालतात. याशिवाय विमा पॉलिसी, NREGS जॉब कार्ड, पेन्शनर कार्ड, स्वातंत्र्यसैनिक कार्ड, किसान पासबुक, CGHS / ECHS कार्ड, वाहन नोंदणी प्रमाणपत्र आदि कागदपत्रे आधारकार्डमधील पत्ता बदलण्यासाठी व्यक्तीला सादर करावे लागेल.**

## संपादकीय

# विद्यार्थ्यांच्या हितासाठीच ढकलगाडी बंद

आयुष्यात परीक्षांना अनन्यसाधारण महत्त्व असून पदोपदी द्याव्या लागणाऱ्या परीक्षा जर आपण चांगल्या प्रकारे पास झालो, तर आपसुकच आपले मनोबल वाढते, आत्मविश्वास द्विगुणीत होतो आणि कोणत्याही परीक्षांना अगदी संकटांनाही धीरोदात्तपणे सोमारे जाण्यास आपण सदैव सज्ज असतो. त्यामुळेच आयुष्याच्या प्रारंभी म्हणजेच शालेय जीवनात द्याव्या लागणाऱ्या विविध परीक्षांना मोलाचे स्थान आहे. जर या परीक्षाच नसतील, तर विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा कस लागणार नाही. गुरुजनांच्या माध्यमातून आपल्याला प्राप्त झालेले नानाविध विषयांचे ज्ञान आपण किती प्रमाणात आत्मसात करू शकलो याचे मूल्यमापन परीक्षांमुळेच शक्य होते. पण काही तज्ज्ञांच्या मते शालेय जीवनात परीक्षांना अतिमहत्त्व दिले जात असल्याचे कारण पुढे करुन आणि त्यास अनुसरुन काही वर्षांपूर्वी तसे शैक्षणिक धोरण आखले गेले. त्यामुळे पहिली ते आठवीपर्यंत परीक्षा घेतल्या जात नव्हत्या व सर्व मुलांना श्रेणी (ग्रेड) नुसार पुढच्या वर्गात पाठविले जात असे. त्यामुळे त्यांच्या शैक्षणिक वर्षांचे नुकसान होत नव्हते. म्हणजेच मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांना आठवीपर्यंत अनुत्तीर्ण करता येत नव्हते. आता नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करावे लागणार आहे. यात गुणवत्तेला अधिक प्राधान्य आहे. त्यासाठीच शालेय शिक्षणात दोन टप्प्यांवर विद्यार्थ्यांची गुणवत्ता जोखण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यासाठी महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ मध्ये राज्य सरकारने सुधारणा केली आहे.

आता नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांची इयत्ता पाचवी आणि आठवीच्या वर्गासाठी वार्षिक परीक्षा घेतली जाणार आहे. पुढील वर्गात प्रवेश मिळविण्यासाठी पाचवी आणि आठवी वर्गाची वार्षिक परीक्षा उत्तीर्ण होणे विद्यार्थ्याला बंधनकारक करण्यात आले आहे. शालेय शिक्षणात पहिली ते आठवी इयत्तांच्या परीक्षा घेतल्या तरी सगळ्याच विद्यार्थ्यांना पुढच्या वर्गात बढती देण्याच्या धोरणात बदल करण्याचा महत्त्वाचा निर्णय राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. विद्यार्थ्यांना सरसकट ८ वीपर्यंत उत्तीर्ण करण्याचा निर्णय बदलण्यात आला आहे. पाचवी आणि आठवी इयत्तेत आता वार्षिक परीक्षा घेण्यात येणार आहे. तसेच इयत्ता पाचवी आणि आठवीच्या या वार्षिक परीक्षांमध्ये जर विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास पुर्नपरीक्षेचा एक चांगला पर्याय विद्यार्थ्यापुढे असणार आहे. मात्र या पुर्नपरीक्षेतही जर विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास इयत्ता पाचवी आणि आठवीच्या त्या वर्गातच संबंधित विद्यार्थ्याला ठेवले जाणार आहे. पाचवीपर्यंत विद्यार्थ्यांना वयानुरुप वर्गात प्रवेश दिला जाईल. सहावी ते आठवीच्या वर्गात वयानुरुप प्रवेश देताना पाचवीच्या वर्गासाठी निश्चित केलेली वार्षिक परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक असेल. जर विद्यार्थी पाचवीची परीक्षा उत्तीर्ण नसल्यास त्याला पाचवीच्याच वर्गात प्रवेश दिला जाईल. आतापर्यंत, या प्रकारच्या आव्हानाला विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागत नव्हते. विद्यार्थी परीक्षा उत्तीर्ण होऊ शकला नाही, तर त्याला अतिरिक्त पूरक मार्गदर्शन करण्यात येईल. वार्षिक परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासून दोन महिन्यांत त्याची पुर्नपरीक्षा घेण्यात येईल. विद्यार्थी पुर्नपरीक्षेच्या गुणपत्रिकेत लाल शेरा आल्यास किंवा तो अनुत्तीर्ण झाल्यास त्याला पुन्हा पाचवी किंवा आठवीच्याच वर्गात ठेवले जाईल. हे करताना प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही विद्यार्थ्याला शाळेतून मात्र काढून टाकले जाणार नाही, याची कटाक्षाने काळजी घेण्यात आली आहे.

शिक्षणाचा हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांना आठवीपर्यंत उत्तीर्ण करणे बंधनकारक होते. पण असे केले गेल्यामुळे विद्यार्थी हा बहुतांश विषयात कच्चा राहू लागला, असल्याची बाब उघड झाली. परिणामी विद्यार्थ्याची गुणवत्ता थेट नववी इयत्तेत दिसत असल्याने वार्षित परीक्षेत अनेक विद्यार्थी अपयशी ठरत होते. पण आता नव्या शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळेच शालेय शिक्षणावेळीच विद्यार्थ्यांची दोन टप्प्यात गुणवत्ता जोखण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यासाठीच महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ मध्ये आता राज्य सरकारने सुधारणा केली आहे. त्यामुळे आता शाळेतील प्रवेशाच्या एक टप्प्यावर म्हणजे पाचवीला परीक्षा देत त्याची गुणवत्ता सिद्ध करावी लागणार आहे. त्यामुळे शिक्षक आणि पालक या दोघांचीही शैक्षणिक जबाबदारी वाढणार आहे. राज्य सरकारच्या या निर्णयावर मतमतांतरे व्यक्त केली जात आहेत. परीक्षा पद्धत बदलत नाही, तोपर्यंत विद्यार्थ्यांना गुणांच्या आधारावर उत्तीर्ण-अनुत्तीर्ण करण्याला कोणताही अर्थ नाही. मुलांची चौकस बुद्धी, सर्जनशीलता, शिकलेल्या गोष्टींची दैनंदिन अनुभवांना सांगड घालणे या गोष्टी तपासल्या जात नाहीत तोपर्यंत खरे मूल्यमापन होणार नाही. सध्याच्या परीक्षा पद्धतीत केवळ माहिती विचारली जाते आणि मुले उत्तरे पाठ करुन ती लिहितात. त्यापलीकडे काही नसते. सध्या परीक्षा घ्यायला हरकत नाही; पण त्या परीक्षेच्या आधारावर पाचवीत अनुत्तीर्ण केल्याने काहीही निष्पन्न होणार नाही. सध्याच्या पद्धतीने परीक्षा घेण्याच्या मार्गात ही गुणात्मक बदल करणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे पहिलीपासून परीक्षाच नाही, असा समज झाला होता; परंतु प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्याचे सर्वंकष मूल्यमापन झाले पाहिजे. त्यामुळे पाचवी आणि आठवीला वार्षिक परीक्षा सुरू करण्याचा निर्णय स्वागतार्हच म्हणावा लागेल. त्यामुळे विद्यार्थ्यामध्ये अभ्यासाविषयी गांभीर्य रुजेल आणि शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होण्यासही मदत होईल. तसेच पाचवी आणि आठवी हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील महत्त्वाचे टप्पे आहेत. त्यामुळे आठत्तीपर्यंतची ढकलगाडी बंद झाल्यास त्या टप्प्यापर्यंत त्यांना शिकवलेल्या गोष्टी व्यवस्थित समजल्या आहेत की, नाही याची पडताळणी होण्याच्या दृष्टीने परीक्षा घेण्याचा निर्णय हा योग्यच म्हणावा लागेल.

# सुरक्षेच्या दृष्टीने जिल्हा प्रशासन व पोलिसांचे बिरसी विमानतळावर अँटी हायजॅकिंग मॉक ड्रिल

**गोंदिया:-** देशांतर्गत आणि राज्यात अतिरेकी कारवायांच्या घटना घडत असताना जिल्ह्यात शांतता, सुव्यवस्थेसाठी सर्वत्र "मॉक ड्रील' मोहीम एखाद्या गंभीर घटनेला सामोरे जाण्याच्या दृष्टीने राबवण्यात येते. यातून प्रशासकीय यंत्रणा कितपत तत्पर आहे.काय उणिवा राहिल्या याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला जातो.आणि पुढील काळात त्या होणार नाहीत याची दक्षता घेण्यात येते. त्या अनुषंगाने येथील बिरसी विमानतळावर जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे, पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक बनकर, बिरसी विमानतळ डायरेक्टर शफीक शहा यांचे मार्गदर्शनाखाली सोमवारच्या सायंकाळी अँटी हायजॅकिंग मॉक ड्रिलचे आयोजन करण्यात आले होते.

३ सशस्त्र आतंकवादयांनी दहशत पसरविण्याचे उद्देश्याने आणि राज्य शासनास व जिल्हा प्रशासनास वेठीस धरण्याकरीता अचानक बीरसी विमानतळावरील प्रवासी विमानातील प्रवाशाना वेठीस धरल्याची माहीती विमानतळ सुरक्षा यंत्रणेकडून मिळताच पोलीस यंत्रणा तातडीने घटनास्थळी पोचली. त्यांनतर विमानातील प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने उपायोजना म्हणून प्रवाशांची कोणतीही जिवीत आणि वित्तहानी न होऊ देता आतंकवाद्यांना मॉक ड्रिल दरम्यान जेरबंद करून ताब्यात घेवून जखमींना अॅम्बुलन्सव्दारे दवाखान्यात पाठविण्यात आले. वेठीस धरलेल्या प्रवाश्यांना मोकळे करण्यात आले.

अँटी हायजॅकिंग मॉक ड्रील मोहिमेत जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे, पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे,अप्पर पोलीस अधीक्षक अशोक बनकर,



बिरसी विमानतळ प्रमुख डायरेक्टर शफीक शहा, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील ताजने, पोलीस उपअधीक्षक नंदिनी चांदपूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली दहशतवाद विरोधी पथक, बिडीडीएस पथक, पोलीस मुख्यालय येथील पोलीस पथक, पो. ठाणे रावणवाडी, गोंदिया ग्रामीण येथील पोलीस पथक, अंगुलीमुद्रा विभाग, विमान सुरक्षा बल व स्टाफ, वैदयकीय स्टाफ, अग्निशामक दल व जलद कृती दल (क्युआरटी), दंगल नियंत्रण आरसीपी २ पथके),बिनतारी संदेश विभाग, मोटर परिवहन विभाग, वाहतूक नियंत्रण शाखा, जिल्हा सुरक्षा शाखा, जिल्हा विशेष शाखा, नक्षल सेल येथील पोलीस अधिकारी अंमलदार इत्यादींनी सहभाग नोंदविला.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबावदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# समिक्षा एका कवितासंग्रहाची




माझे सहकारी, ओबीसी कार्यकर्ते विचारवंत, लेखक व कवी सतिश जामोदकर यांचा ओबीसींच्या बावन्न कविता हा १० ऑगस्ट २०२० रोजी, सुधीर प्रकाशन, वर्धा यांनी प्रकाशित केलेला काव्यसंग्रह नुकताच माझ्या वाचनात आला. कवितासंग्रहाच्या नावापासूनच हा कवितासंग्रह मार्मिक बनत गेला आहे. आणि त्यातील सर्व बावन्न कविता जेव्हा मी एकादमात वाचल्या तेव्हा या कवितासंग्रहातील ओबीसींच्या ५२ कविता म्हणजे ओबीसी समाजाचे विदारक चित्र आहे असे मला प्रकर्षाने जाणवले.

कवि लिहितात-

ओबीसी अस्मिता गमावलेले
अस्तित्व हरवलेले
सदैव मेंढावरच
उभे राहणारा
धड इकडचे
ना तिकडचे
जिकडे हाकलले
तिकडे जाणारे मेंढरं

मंडलपूर्व ओबीसींची मत्ता व कथा कवी जामोदकरांनी त्यांच्या कवितासंग्रहामध्ये नेमकेपणाने मांडली आहे. परंतु कधीकाळी हा ओबीसी समाज या देशाचा मालक होता. चालक होता, शासक होता. मात्र त्याला कपटाने फसवलं गेलं आहे, मनुच्या कलमाने मानसिक गुलाम केले आहे. हे सांगायला कवी विसरत नाही.

ओबीसी या देशाचे
मालक होते
देशाचे शासक होते
ते आले
त्यांनी कपटाने फसवले
आणि मनुच्या कलमांनी
मानसिक गुलाम केले.

ओबीसीचा दिनक्रम कसा असतो याविषयी कवी आपल्या कवितेत लिहितात की,

ओबीसी दिवसभर घाम गाळून
क्षमतेप्रमाणे काम करुन
सयसंध्याकाळी घरी येतात
चहाच्या घोटा बरोबर
बायको-लेकरांशी गप्पा मारतात
मग बाहेर जाऊन फिरुन येतात
रात्री जेवता-जेवता
टी.व्ही. पाहतात
काही मालिका काही बातम्या
बातम्या वरवरच्या
वायफळ चर्च्या
ऐकतात
अन् मुकाट
झोपी जातात.

कवी जामोदकर ओबीसी समाज हा सामाजिक चळवळीकडे न वळल्याने कसा बनला आहे, याविषयी लिहितात की,

ओबीसी त्याला
भांडता
झगडता येत
नाही
आमची जणगणना
करा
म्हणता येत नाही...
तो रस्त्यावर येत नाही
मोर्चे आंदोलन धरणे
निवेदन देत नाही
आम्ही ओबीसी असेही
त्याला म्हणता येत नाही.

असे असले तरी मंडलोत्तर ओबीसी बदलला आहे. असे कवीला वाटते म्हणून कवी लिहितात.

ओबीसींच्या जुन्या मातीच्या
जाड भिंती आता सोडत आहेत
अलगत माती
उघडे-नागडे होत आहे
लाल-पांढरे दगड-धोंडे

अशा या मंडोलत्तर परिवर्तन येऊ घातलेल्या ओबीसींच्या हातून कोणकोणते कार्य घडावे याबद्दल कवी लिहितात की,

ओबीसींनी निर्मावे साहित्य
कथा, कविता कादंबऱ्या
नाही तर वैचारिक समिक्षा
किंवा निबंध, लेख एखादे स्फुट
अन् द्यावा तडका
ज्यातून बाहेर येईल
ओबीसीतील लाव्हा

अशा या ओबीसीबद्दल कवी जामोदकर बरेच आशावादी आ-हेत. शेवटी ते बाबासाहेबांचा दाखला देऊन लिहितात की,

पण आता असे असणार नाही
बाबासाहेब म्हणतात
हा झोपलेला सिंह आहे
जागल्या परिवर्तन होणार
खरेच फुले-शाहू-आंबेडकरांच्या
विचाराने ओबीसी जागणार आहे
बाबासाहेबांचे शब्द खरे करणार
आहे.

असा हा कवितासंग्रह मंडल आयोगाचे महत्व व फुले शाहू आंबेडकरांचे ओबीसी समाजासाठीचे योगदान नेमकेपणाने मांडतो आहे. परंतु हा कुंभकर्णी ओबीसी समाज या महापुरुषांच्या विचारांपासून अजूनपर्यंत कसा हजारो कोस लांब आहे, हे वास्तवही हा कवितासंग्रह अधोरेखित करतो आहे. व परंपरावादी ओबीसींना आत्मचिंतन करायला भाग पाडतो आहे. हे या कवितासंग्रहाचे यश आहे. म्हणून कवी जामोदकरांचा हा कवितासंग्रह ओबीसींच्या घराघरात पोहचला पाहिजे व त्याचबरोबर ४ थी, ५ वी पासूनच्या सर्व विद्यार्थ्यांकडून त्या पाठ करुन घेतल्या गेल्या पाहिजेत. तरच ओबीसींची भावी पिढी आपल्या संवैधानिक हक्कासाठी भविष्यात पेटून उठेल असे कवीमताशी मलाला सहामती द्यावीशी वाटते.

एक चांगला, सकस कवितासंग्रह वाचायला मिळाल्यामुळे मी कवी सतिश जामोदकरांचा आभारी आहे. त्यांच्या हातून असेच उत्तमोत्तम साहित्य निर्माण व्हावे ओबीसी समाजाला त्यातून आत्मभान प्राप्त व्हावे. अशी सदिच्छा व्यक्त करुन सतिश जामोदकरांना पुढील साहित्य निर्मितीसाठी शुभेच्छा देतो.

ओबीसीच्या बावन्न कविता
कवी.. सतीश माणिकराव जामोदकर
सुधीर प्रकाशन, गणेश नगर, वर्धा
मुल्य रू.१५०/-
(समिक्षक: राजाराम सूर्यवंशी, बदलापूर दि.१०/०१/२०२३ भ्रमणध्वनी क्र.९५०३८६७६०२)

# थोर समाजसुधारक राजर्षी छत्रपती शाहू महाराज

शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. त्यांचे संपूर्ण नाव यशवंत जयसिंगराव घाटगे असे होते. त्यांच्या आईचे नाव राधाबाई होते. कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी यशवंतला दत्तक घेतले. त्याचे "शाहू" असे नामकरण करण्यात आले. शाहू महाराज लहानपणापासून कुशाग्र बुद्धीचे आणि न्यायप्रिय होते.

इ.स.१८८९ ते १८९३ या काळात शाहू महाराजांनी आपले शिक्षण पूर्ण केले. १ एप्रिल १८९१ साली ते लक्ष्मीबाई खानविलकर यांच्याशी विवाहबद्ध झाले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर १८९४ साली त्यांचा राज्याभिषेक करण्यात आला. बहुजन समाजात शिक्षण प्रसार करण्याचे महत्त्वपूर्ण काम त्यांनी केले. संस्थानातील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत दिले. स्त्री शिक्षणासाठी देखील ते नेहमी आग्रही होते. जातीभेद आणि अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी आंतरजातीय विवाहाला मान्यता दिली. अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवणे बंद केले.

१८९६ साली पडलेला दुष्काळ आणि त्यानंतर आलेली प्लेगची साथ, तशा संकटसमयी शाहू महाराजांनी दुष्काळी कामे, स्वस्त धान्य दुकाने, निराधार आश्रमाची स्थापना केली. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उच्च शिक्षणासाठी आणि मूकनायक वृत्तपत्रासाठी सहकार्य केले. शाहुपुरी व्यापारपेठ, शेतकी तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी "किंग एडवर्ड अॅग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट'ची स्थापना, शेतकऱ्यांची सहकारी संस्था, राधानगरी धरणाची उभारणी, अशा समाजोपयोगी कामातून शेतकऱ्यांसाठी विशेष उपक्रम राबवले. अशा सर्व कामांतून त्यांचा कृषी विकासातील दृष्टिकोन दिसून येतो.



शाहू महाराजांना "राजर्षी' ही उपाधी कानपूरच्या कुर्मी क्षत्रिय समाजाने दिली. त्यांनी आपल्या जीवनकार्यात समाजातील सर्व घटकांना समाविष्ट करून घेतले. आपल्या अधिकारांचा फायदा बहुजन समाजाला मिळवून दिला. त्यांच्या न्यायासाठी आणि शिक्षणासाठी ते नेहमी झटले. त्यांच्या सर्वाभिमुख विकासाच्या दृष्टिकोनामुळे इतिहासकारांनी त्यांची नोंद लोककल्याणकारी राज्यकर्ता म्हणून केली आहे. ६ मे १९२२ रोजी मुंबई येथे त्यांचे निधन झाले. आपल्या कारकिदीत त्यांनी शिक्षण, कृषी, उद्योग, कला, क्रीडा व आरोग्य अशा सर्वच क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान आणि चालना दिली. अशा या राजर्षी व्यक्तिमत्त्वास मानाचे अभिवादन !

सामाजिक न्यायाच्या शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना आहेत. त्यामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार, मुला-मुलींसाठी शासकीय वसतिगृहे, रमाई आवास योजना, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, सफाई कामगारांच्या मुला-मुलींसाठी पब्लिक स्कूल, कन्यादान योजना, अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा, अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या बचतगटांना मिनी ट्रॅक्टर व उपसाधनांचा पुरवठा करणे, अनुसूचित जाती व नवबौध्द मुला-मुलींसाठी निवासी शाळा, आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना आदी योजनांचा यात समावेश आहे. सदर योजनांचा लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा व आपले जीवनमान उंचवावे.

**कैलाश गजभिये**
उपसंपादक, जिल्हा माहिती कार्यालय,गोंदिया

# समाजभवनांचा वापर अवैध कामांसाठी



**गोंदिया:-** ग्रामीण भागात शासनाच्या विविध योजनासंह लोकप्रतिनिधींच्या निधीतून उभारण्यात आलेल्या समाजभवनाचे रुपांतर गोदाम, गाईचे गोठे आणि तर काही जुगार अड्याच्या केंद्रात झाले असून त्यावर कुठलाच वचक नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

गावखेडयामध्ये विविध सामाजिक, शैक्षणिक आणि इतरही कार्यक्रम घेण्यासाठी समाज मंदिर उभारण्यात आली आहेत. गेल्या काही दिवसात मात्र त्या त्या वस्तीमधील संबधित भागातील नेत्यांनी त्यावर कब्जा करुन बसले आहे.

काही दिवसांपूर्वी गोंदिया तालुक्यातील ग्रामीण भागातील समाज मंदिराची पाहणी केली असता ते बंद दिसून आले.तर काही ठिकाणी शेजारीच जनावरे बांधलेली दिसून आली तर कुणी जनावरांचा चारा तणस साठवूण ठेवण्यासाठी करीत असल्याचे दिसून आले. वस्त्यांमध्ये कार्यक्रमासाठी किंवा एखाद्या धर्मासाठी मंदिर किंवा समाजभवनाची निर्मिती शासनाच्या २५१५-३०५४ सह आमदार वा खासदार फंडातून करण्यात आले आहे.

# व्ही.पी.सिंग:मूल्याधिष्ठित राजनीतीचे महानायक



'तत्त्वनिष्ठेची जपणूक' या सोमनाथ चटर्जी यांच्या आत्मचरित्रात ते म्हणतात की, व्ही.पी.सिंग हे मूल्याधिष्ठित राजकारणाचे तसेच सामाजिक न्यायाचे प्रतिक होत. प्रधानमंत्री व्ही.पी.सिंग हे सर्वसहमती, मूल्याधिष्ठित राजकारण आणि सामाजिक न्यायाचे प्रतीक होते. भारतीय समाजात न्याय आणि निती मूल्ये यांना अत्युच्च स्थान आहे. न्याय नितीचे अधिष्ठान असलेले तत्त्वज्ञान शिरसावंद्य मानले जाते. महत्त्म लोकांच्या हितार्थ निती मूल्यांसाठी संघर्ष करणारी अवैदिक परंपरा प्रदीर्घकाळ राहिलेली आहे. ती आजही कायम आहे. वैदिकांच्या क्रूर अमानवी जुलमी व्यवस्थेविरुद्ध लढत असताना अवैदिक योद्ध्यांनी किंचितही मानवी नीतिमूल्ये ढळू दिली नाहीत. याचे असंख्य दाखले अगदी प्राचीन काळापासून मिळतात.

बळीवंशातील सर्वच राजे या बाबतीत फार फार वेगळे होते. स्वकीय जनांच्या सुखासाठी शत्रूंशी झगडताना आपल्या प्राणांसह आपले सर्वस्व लुबाडले-ओरबडले गेले तरी त्याची पर्वा करायची नाही, ही त्यांच्या जगण्याचीही आणि मरण्याचीही रीत होती. त्यांना सत्ता नको होती असे नाही, परंतु आपली सत्ता विशिष्ट तत्त्वज्ञानावर, नीतिमूल्यांवर, जीवनदर्शनावर उभी असली पाहिजे, याची पुरेपूर काळजी ते घेत होते. त्यांनी आपल्या हाताने आपल्या स्वातंत्र्याच्या आकांक्षा विसर्जित केल्या असत्या आणि आक्रमक आर्य आपल्यापेक्षा वरचढ होत आहेत म्हटल्यावर त्यांच्यापुढे शरणागती पत्करली असती, तर त्यांच्या इतक्या पिढ्यांना आपले प्राण गमवावे लागले नसते. त्यांनी स्वतःच वैदिकांच्या रंगात रंगून जायचे ठरविले असते, तर आर्यांचे मांडलिक म्हणून ते सुखेनैव जगू शकले असते आणि त्यांनी टाकलेल्या सत्तेच्या छोट्यामोठ्या तुकड्यांवर पोट भरण्यासाठी लाळ घोटत सुखी राहू शकले असते. परंतु त्यांच्यापैकी कोणीही आत्मद्रोहाचा हा मार्ग पत्करला नाही. त्यांच्या सैन्यातील व प्रजेतील काही व्यक्तींनी वा गटांनी गद्दारीचा मार्ग स्वीकारला, हे खरे आहे. परंतु हिरण्याक्षापासून बाणापर्यंत कोणीही आपल्या जीवनमूल्यांपेक्षा आपल्या प्राणांना अधिक महत्त्व दिले नाही, मग त्यांच्याकडून जीवनमूल्यांपेक्षा सत्तेला अधिक महत्त्व दिले जाण्याची शक्यता तर फार दूरची झाली. अगदी जीवघेण्या संघर्षांतही त्यांची हृदये स्वच्छ आणि मस्तके ताठ राहिली. त्यांच्या पद्धतीने जगणे हे तर खरे जगणे आहेच, पण त्यांच्या पद्धतीने मरणे हे देखील जीवनाचा झेंडा उंच उंच फडकविण्यासारखे आहे! (पृ. १४६-४७, बळीवंश, ले. डॉ आ ह साळुंखे) बळीराजा आणि बळीवंशातील ही नितीमूल्ये व्ही.पी.सिंगांनाही आपलीशी वाटावी यातच नीतीमूल्यांची यथार्थता दडलेली आहे. एका राजकीय अस्थिर परिस्थितीत लोकसभा त्रिशंकू असताना व्ही.पी. सिंग सरकार स्थापन झाले.

जनता दलाच्या पुढाकाराने राष्ट्रीय आघाडी सरकारला बेभरवशाच्या भाजपचे बाहेरुन समर्थन. अशा परिस्थितीत सरकार अकराच महिने तरले. पण अनेक क्रांतिकारक निर्णय घेत व्ही.पी.सिंग सरकार भारतीय राजकारणाच्या इतिहासात अविस्मरणीय ठरले. व्ही.पी.सिंगांनी मंडल आयोग लागू केला तेव्हा फार तणावग्रस्त स्थिती होती. एकीकडे मंडलची मागणी जोर धरत होती. व्ही.पी.सिंगांसोबतची मंडळी मंडल समर्थनार्थ तगडी होत होती. व्ही.पी.सिंग ज्या राष्ट्रीय आघाडीचे नेतृत्व करीत तिच्या जाहीरनाम्यात मंडल आयोग ओबीसींसाठी सवलती देण्याची मागणी होती. त्यामुळे व्ही.पी.सिंगांना मंडल आयोगाची अंमलबजावणी करणे ही मोठी कामगिरी पार पाडणे आव्हानात्मक होते. तर त्यांच्या सरकारला पाठिंबा असलेला भाजप आरक्षणाविरोधात असल्याने सरकार डळमळीत होण्याची शक्यता होती.

भाजपाने मंदिर-मस्जिदचा मुद्दा उकरुन काढला आणि मंडलच्या वातावरणाला गढूळ करून टाकले. व्ही.पी.सिंग यांनी मंडल लागू करू नये यास्तव ही कावेबाज चाल होती. सरकार पडण्याची तमा न बाळगता व्ही.पी.सिंग यांनी मंडल आयोग लागू केला. मंडल आयोग लागू केल्याबरोबर व्ही.पी.सिंगांवर प्रचंड टीका होऊ लागली. व्ही.पी.सिंगांना राक्षसाची उपमा देऊन आरक्षण विरोधक तुटून पडू लागले. इलेक्ट्रॉनिक्स मीडिया व प्रिंट मीडिया यांनी व्ही.पी.सिंगांवर अतोनात तोंडसुख घेतले. विश्वनाथ प्रताप सिंगांची प्रतिमा संपूर्णतः खलनायकाची रंगवण्यात तसूभरही कसर ठेवली नाही. ओबीसीचा मसिहा व्ही.पी.सिंग प्रचंड दुःखी अंतःकरणाने पण धीरगंभीरपणाने ही परिस्थिती पहात होते. राजकीय अस्थैर्य आणि तणाव दिसून येत होता. पण व्ही.पी.सिंगांनी मंडलची घोषणा मागे घेतली नाही.

व्ही.पी.सिंग काही मुस्लिम नव्हते. बौद्ध, जैन, पारशी अथवा ख्रिश्चन नव्हते. हिंदुविरोधीही नव्हते. ते हिंदू राजपूत होते, आणि बहुसंख्य मागास हिंदु असलेल्या ओबीसींच्या उत्कर्षासाठी भारतीय संविधानात अनुस्यूत असलेल्या कलम ३४० अन्वये स्थापित मंडल आयोग त्यांनी लागू केला होता. काय गुन्हा होता हा? की व्ही.पी.सिंगांना खलनायक, रावण, राक्षस ठरविण्यात आले होते. हे तेच व्ही.पी.सिंग होते ज्यांनी राजीव गांधींच्या काळातील बोफोर्स प्रकरणातील गैरव्यवहार चव्हाट्यावर आल्यानंतर नैतिक जबाबदारी म्हणून भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या मंत्री मंडळातून, मंत्रीपदाचा राजीनामा देऊन बाहेर पडले. स्वच्छ प्रतिमेचे नायक बनले होते. नीतीयुक्त राजनीतीचे प्रतीक बनले होते.

तत्कालीन प्रस्थापित राजकारणाला भ्रष्टाचारमुक्त पर्याय उभा करण्यासाठी विश्वनाथ प्रतापसिंग स्वच्छ प्रतिमेचा खात्रीचा चेहरा बनले होते. पण मंडल आयोग लागू करताच ते खलनायक वाटू लागते. व्यक्ती तीच होती, विश्वनाथ प्रतापसिंग, पण एका निर्णयाने माणसाची प्रतिमा सुलटची उलट बनविली. एवढा धसका मंडल आयोगाचा अर्थात ओबीसींना आरक्षण लागू होण्याचा का घेतला गेला? एससी एसटीच्या आरक्षणाला छुपा-खुला विरोध करत ज्यांनी ओबीसींची माथी भडकवली, आता मंडल शिफारशी नुसार ओबीसींना मिळणार असलेल्या आरक्षणामुळे त्यांच्या पोटात गोळा येऊ लागला. एससी-एसटीचे २२.५% आरक्षण कोटा वगळता संपूर्ण खुल्या प्रवर्गात ओबीसींना डावलून उच्चवर्णीयांचे उखळ पांढरे होत होते. उच्चवर्णीयांची प्रशासनात असलेली सद्दी ओबीसी आरक्षणामुळे पूर्णतः संपली तर नसतीच, पण ओबीसीचा टक्का वाढल्याने उच्चजातीयांच्या बरोबरीचा वाटा ओबीसींना प्रशासनात, निर्णय प्रक्रियेत नकोच! ओबीसींची उच्चजातीसोबत बरोबरी नको! हिच उच्चजातीय समूहाची कपटनिती राहिलेली आहे. "प्रधानमंत्री व्ही.पी.सिंग (१९८९-१९९०) यांचे उदाहरण अगदी अलिकडचे आहे. मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार ओबीसींना नोकऱ्यात राखीव जागा देण्याचा निर्णय घेतल्याने ब्राम्हणांचे नोकऱ्यातील प्रमाण काहीसे कमी होण्याची स्थिती निर्माण झाली होती. खरे तर वंचित समाजाला, इतर मागासवर्गाला संधी देण्यासाठी हा निर्णय घेतल्या गेला होता. परंतु ओबीसींना हलाखीच्या अवस्थतेतून बाहेर काढण्याचा प्रयत्न मनुस्मृतीच्या समर्थकांना देशद्रोह वाटला.

ब्राम्हणाचे प्राबल्य कमी करणारा निर्णय म्हणून त्याकडे पाहिले गेले आणि प्रसार माध्यमामधून व्ही.पी.सिंगांची प्रचंड बदनामी केली गेली. वरच्या हिंदूंसाठी राबणाऱ्या हिंदुत्ववादी संघटनांकडून व्ही.पी.सिंगांना, विलन ठरविले गेले, रावण संबोधून प्रतिमांचे दहन केले गेले. ज्या संघटना, राजकीय पक्ष अयोध्येला राममंदिर बांधण्यासाठी धडपडतात त्या सर्व ओबीर्सी विरोधी आहे मागास जातींच्या विरोधी आहे. मुस्लिमविरोधी आहे. मंडल आयोगाला विरोध करून त्यांनी मागासजाती आणि मुस्लिमांना टार्गेट केले. म्हणजे ब्राह्मणच शासन, प्रशासनात राहू शकतात, उच्च स्थानी राहू शकतात, आरक्षणाच्या माध्यमातून मागासवर्गीय आले तरी त्यांना दुय्यम स्थाने दिली जातात. उच्च जात सत्ता टिकविली जाते. (पृ. ३५-३६, रा. स्व. संघ, जातीव्यवस्था आणि हिंदुराष्ट्र, ले. नागेश चौधरी) म्हणून ओबीसी आरक्षणास कळीचा विरोध होता. त्यामुळे व्ही.पी.सिंगांनी मंडल आयोग लागू करताच ब्रह्मवृंदाचा जळफळाट पाहण्याजोगा होता. व्ही.पी.सिंग मात्र निर्णयावर ठाम होते. मंडलचा निर्णय फिरवला असता, तर कदाचित ते बचावले असते. ते दीर्घकाळ प्रधानमंत्री पदावर कायम राहिले असते. अटलबिहारी वाजपेयींना राजयोगाने हुलकावणीही दिली असती. घोटाळ्यांची दीर्घमालिका ज्यांच्या काळात गाजली ते पी.व्ही.नरसिंहरावांसारखे प्यादे चालले नसते.व्ही.पी.सिंग सरकार पडल्यानंतर जनता दल या पक्षाचेही अपूर्व नुकसान झाले. देशभर जनता दलाचा वाढलेला जनाधार खंडित होऊ लागला. जनता दलाचे विभाजन होऊन राष्ट्रीय पातळीवरील सक्षम पर्याय खिळखिळा होऊ लागला. मंडल विरुद्ध कमंडल रान पेटले ते ओबीसी हित विरोधासाठी, राम रथयात्रा, हिंदुत्वाचा टेंभा, मुस्लिम-विरोधाचा तडका, धार्मिक दंगे, बॉम्ब स्फोट भडका, बाबरी विध्वंस आणि जातीय-धार्मिक तेढ निर्माण करुन, ओबीसींना मंडलच्या लढ्यापासून दूर दूर नेण्यासाठीच ह्या कुरापती होत्या, असाच या घटनाक्रमाचा अन्वयार्थ लागेल. मंडलची घोषणा झाली नसती तर कदाचित हा घटनाक्रम वेगळा दिसला असता पण मंडलच्या घोषणेने ही जरतरची समीकरणे बिघडवून टाकली.

व्ही.पी.सिंगांनी निवडणूक जाहीरनाम्यात दिलेला शब्द पाळला. ते ओबीसीचा मसीहा ठरलेत. व्ही.पी.सिंग सरकार पडले, पण व्ही.पी.सिंग जिंकले.व्ही.पी.सिंगांनी स्वकीय जनांच्या हितासाठी ओबीसींच्या सुखासाठी, नीती मूल्याधिष्ठित तत्वासाठी प्रधानमंत्री पदाकडे कानाडोळा केला. सत्तेची पर्वा केली नाही. सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला प्रतिष्ठा प्राप्त झाली. सामाजिक न्याय, ओबीसीकेंद्रित राजकारणाचा होरा दिसू लागला.व्ही.पी.सिंग या मूल्याधिष्ठित राजनीतीचे महानायक होते.

**अनुज हुलके**

# नवीन पूलाचे दोन वेळा भूमिपूजन

**सालेकसा:** तालुक्यातील बोदलबोडी भजेपारदरम्यान वाघ नदीवर नवीन पुलाच्या बांधकामासाठी माजी आमदार संजय पुराम आणि विद्यमान आमदार सहषराम कोरोटे यांच्या हस्ते आपापल्या काळात दोन वेळा भूमिपूजन करण्यात आले. परंतु दोन्ही भूमिपूजन कार्यक्रमांना साडेतीन ते चार वर्षे लोटली तरी अद्याप पूलाचे बांधकाम सुरु झाले नाही. श्रेय लाटण्याच्या घाईत भूमिपूजन केले, परंतु लोकांचा विश्वास मात्र कमी होत चालला आहे. तालुक्यातील अनेक गावांना दुभागणाऱ्या वाघ नदीवर सुमारे दहा कोटी रुपये खर्चून बांधण्यात येणाऱ्या पुलाची प्रतीक्षा कायम आहे.



तालुक्यातील ग्राम भजेपार परिसरातील अनेक गावांचा तसेच आमगाव तालुक्यातीलही काही गावांचा सालेकसा मुख्यालयाशी असलेला संपर्क पावसाळ्यात अनेकदा तुटतो. परिणामी सालेकसा तालुका मुख्यालयात जाण्यासाठी नागरिक व विद्यार्थ्यांना पावसाळ्यात सुमारे १२ ते १३ किमी अंतर कापावे लागते. त्याचप्रमाणे बोदलबोडी परिसर आणि आमगाव येथे जाण्यासाठी नागरिकांना सुमारे १७ किमी अंतर कापून प्रवास करावा लागतो. त्यामुळे लोकांचे पैसे आणि वेळ वाया जात आहे. भजेपार व बोदलबोडी परिसरातील नागरिकांनी गेल्या १० वर्षाहून अधिक काळापासून वाघ नदीवर पूल बांधण्याची मागणी केली होती. ही बाब लक्षात घेऊन माजी आमदार संजय पुराम यांनी या पूलाच्या बांधकामाला मंजूरी दिली व सहा कोटी रुपयांचा निधी मंजूर करुन भूमिपूजन केले. मात्र त्यानंतर निवडणूक झाली आणि सहषराम कोरोटे आमदार झाले. आमदार होताच त्यांची पूल मंजूर केल्याचा दावा केला आणि सुमारे ६ महिन्यांच्या कार्यकाळात या पूलाचे भूमिपूजन केले आणि काम सुरु करण्यासाठी मशी-नही कंत्राटदाराकडून बसवण्यात आली.

### नागरिकांना पुलाची प्रतीक्षा

**विद्यार्थी व नागरिकांचे उन-पावसात हाल होत असून पावसाळा दार ठोठावत आहे. अशा स्थितीत भजेपार व बोदलबोडी परिसरातील नागरिकांच्या समस्या कधी दूर होतील व या पूलाचे काम कधी सुरु होईल, याची प्रतीक्षा परिसरातील विद्यार्थी व नागरिक करित आहेत.**

**बोदलबोडी ते भजेपारदरम्यान बांधण्यात येणाऱ्या पुलाच्या डिझाईनमध्ये बदल करण्यात आल्याने अडचण निर्माण झाली आहे. मात्र या पुलाच्या बदललेल्या डिझाईनला लवकरच मंजूरी मिळावी यासाठी मी प्रयत्नशील असून येत्या १५ दिवसात या पुलाचे नवे डिझाईन तयार करण्यात येईल, पुल मंजूर होऊन काम सुरु होण्याची शक्यता आहे.**

**सहषराम कोरोटे, आमदार आमगाव-देवरी विधानसभा क्षेत्र**

**पुलासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात आली होती व नवीन पुलाच्या बांधकामासाठी सर्व तयारी झालेली होती. परंतु राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आले आणि पुलाचे काम थंडबस्त्यात गेले.**

**संजय पुराम, माजी आमदार-देवरी विधानसभा क्षेत्र**

पण पुलाचे डिझाईन आधी मुरुमच्या जमिनीवर बांधायचे होते. मात्र काम सुरु केल्यानंतर जमिनीला खड्डा पडला आणि दगडी जमिनीनुसार पुलाचे डिझाईन तयार करण्यात आले. डिझाईन बदलण्यासाठी संबंधित विभागाकडे गेले मात्र तीन वर्षे उलटूनही आतापर्यंत याच्या डिझाईनमध्ये बदल करण्याचा प्रस्ताव पुलासाठी संबंधित विभागाकडून मंत्रालयापर्यंत टाळाटाळ केली जात आहे.

# ४३ कृषी केंद्राचे परवाने निलंबित

**गोंदिया :-** जिल्ह्यात खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर बोगस बि-बियाणे, खते व किटकनाशकाच्या विक्रीस आळा घालण्यासाठी कृषी विभागाने ९ भरारी पथक स्थापन केली आहेत. भरारी पथकामार्फत अचानक तपासणीसाठी धडक मोहिम जिल्ह्यात राबविली जात आहे.



कृषी केंद्राच्या तपासणीवेळी विक्री परवान्यामध्ये उगम प्रमाणपत्राचा समावेश नसणे, नोंदणी प्रमाणपत्र विहित मुदतीत नुतनीकरण न करणे, शिल्लक साठा व दरपत्रक दर्शनी भागात न लावणे, साठा व विक्री रजिष्टर न ठेवणे, रजिस्टरवरील साठा व प्रत्यक्ष साठा न जुळणे, मुदतबाह्य किटकनाशक साठा विक्रीसाठी ठेवणे आदी कारणांमुळे ४३ निविष्ठाधारकांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. त्यामध्ये गोंदिया-०७, सडक अर्जुनी-२०, अर्जुनी मोरगाव-११, सालेकसा-०३, गोरेगाव-२ (बियाणे-३, रासायनिक खते-३६, किटकनाशक-४) एकूण ४३ कृषि निविष्ठा परवाने समावेश असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हिंदुराव चव्हाण यांनी दिली.

कृषी सेवा केंद्र चालकांनी बियाणे, रासायनिक खतांची साठेबाजी केली अथवा जादा दराने खत विक्री केल्यास कायद्यांतर्गत कठोर कार्यवाही करण्यात येईल असा इशारा त्यांनी दिला आहे. शेतकऱ्यांनी अधिकृत परवान-ाधारक कृषी सेवा केंद्राकडून खते, बियाणे व किटकनाशकाची खरेदी करावी.

खरेदी करतांना कृषी निविष्ठा केंद्राकडून निविष्ठा खरेदीची पक्के बिले घ्यावे, त्यावरील नमुद एमआरपी प्रमाणे मालाची खरेदी करण्यास प्राधान्य द्यावे, तसेच एमआरपी पेक्षा जास्त दराने मालाची विक्री होत असल्यास कृषी विभागाकडे तक्रार करावी. त्याची तात्काळ दखल घेऊन बियाणे कायदा १९६६, बियाणे नियम १९६८, बियाणे नियंत्रण आदेश १९८३, खत नियंत्रण आदेश १९८५, अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५, किटकनाशक कायदा १९६८, किटकनाशक नियम १९७१ नुसार संबंधितांवर कार्यवाही करण्यात येईल. असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, गोंदिया यांनी कळविले आहे.

# अत्याचार करणाऱ्या आरोपींना कठोर शिक्षा द्या

## आदिवासी पीपल फेडरेशनची मागणी : जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**गोंदिया:** गडचिरोली जिल्ह्याच्या एटापल्ली तालुक्यातील आदिवासी समुदायातील अल्पवयीन मुलगी दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर प्रमाणपत्र घेण्यासाठी गेली असता आलापल्ली येथे दोन युवकांनी सामूहिक अत्याचार केला. या घटनेचा नॅशनल आदिवासी पीपल फेडरेशन गोंदियाच्यावतीने निषेध करण्यात आले. दरम्यान, अत्याचारातील दोन्ही आरोपींवर कारवाई करुन कठोर शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातनू करण्यात आली.



गडचिरोली जिल्ह्यातील महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनेत मोठ्या प्रमाणात वाढ होत असून प्रशासन आणि लोकप्रतिनिधी महिलांच्या सुरक्षेच्या संदर्भात उदासीन आहे. दिवसागणिक जिल्ह्यातील महिलांवर अत्याचाराचे प्रमाण वाढत आहे. तरी सरकारने आणि प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन महिलांच्या सुरक्षाकरिता ठोस पावले उचलावी, तसेच एटापल्ली तालुक्यातील आदिवासी समाजातील अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचारातील दोन्ही आरोपींना कठोर शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी नेशनल आदिवासी पिपल फेडरेशनने निवेदनातून केली आहे. निवेदन देतेवेळी, प्रामुख्याने नेशनल आदिवासी पीपल फेडरेशनचे केंद्रीय सचिव दुर्गाप्रसाद कोकुडे, जिल्हाध्यक्ष करण टेकाम, सचिव नीलकंठ चिचाम, महिला उपाध्यक्ष संगीता पुसाम, चत्रुघन मरकोल्हे, पी.बी. टेकाम, हेमंत पंधरे, रंजना उईके, दिलेश्वरी मरसकोल्हे, मनीष पुसाम, चंद्रशेखर वाढवे, माजी पंचायत समिती सदस्य प्रशांत सिडाम सह इतर महिला व नागरिक उपस्थित होते.

# सर्व यंत्रणाच्या समन्वयाने किंडगीपारला आदर्श ग्राम करणार-कुलगुरु डॉ.शरदचंद्र गडाख

**गोंदिया:** डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला अंतर्गत विदर्भातील ११ गावांची आदर्श ग्राम म्हणून निवड करण्यात आलेली असून यामध्ये जिल्ह्यातील गोंदिया तालुक्यातील किंडगीपार गावाची निवड झाली आहे. विविध विभागाच्या योजनांच्या व विद्यापिठाच्या विकसीत तंत्रज्ञानाच्या सहाय्याने किंडकीपारला एक आदर्श ग्राम म्हणून विकसीत करणार, असे प्रतिपादन डॉ.पंजाबराव कृषि विद्यापीठ अकोलाचे कुलगुरु डॉ.शरदचंद्र गडाख यांनी केले.




१६ जून रोजी गोंदिया तालुक्यातील किंडगीपार येथे कृषि विज्ञान केंद्र गोंदिया यांचेमार्फत खरीप हंगामपुर्व शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी ते बोलत होते. जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, डॉ.धनराज उंदीरवाडे संचालक विस्तार शिक्षण डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला, प्रकल्प संचालक आत्मा अजित अडसुळे, कृषि उपसंचालक सुरेश कन्नाके, डॉ.सय्यद शाकीर अली वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख कृषि विज्ञान केंद्र हिवरा यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

आदर्श ग्राम संकल्पनेची पार्श्वभूमी सांगतांना सर्वप्रथम नोव्हेंबर २०२२ मध्ये या गा-वात कृषि विज्ञान केंद्र हिवरा मार्फत सामाजिक आर्थिक सर्वेक्षण करण्यात आले. यामध्ये भौगोलिक क्षेत्र, स्त्री व पुरुष लोकसंख्या, प्रमुख पीक, उत्पन्न, उत्पादकता इत्यादिंचा अंतर्भाव करण्यात आला. या सर्वेक्षणाच्या आधारे मिळविलेल्या माहितीचे विश्लेषण करुन या गावामध्ये शास्त्रज्ञ सभांचे आयोजन, शास्त्रज्ञ भेटीचे आयोजन करण्यात आले व या गावाची आदर्श ग्राम म्हणून विकसीत करण्यासाठी निवड करण्यात आली. सदर गावामध्ये शेतीचे उत्पादकता वाढविण्यासाठी उत्पादन खर्च कमी करणे, उत्पादन ते मार्केटिंग अशी मुल्यसाखळी विकसीत करणे, एकात्मिक शेती पध्द-तीचा अवलंब करुन शेती फायदयाची करणे, फळबाग लागवड, औजारे, बँक संकल्पना राबविणे इत्यादी कामे नियोजित असल्याचे त्यांनी सांगितले.

अनिल पाटील यांनी जिल्हा प्रशासन, विविध शासकीय यंत्रणा ही सदैव किंडगीपार ग्रामस्थांच्या पाठीशी उभी राहून गावाला आदर्श ग्राम निर्माण करण्यास प्रयत्नशील असल्याचे सांगितले. डॉ.धनराज उंदीरवाडे यांनी किंडगीपार गावामध्ये येत्या खरीपात धान पिकाच्या लागवडीकरीता श्री पध्दत, पट्टा पध्दत, मेटारायझीमचा वापर कशाप्रकारे फायदेशीर आहे याबाबत माहिती दिली. अजित अडसुळे यांनी आत्मा व कृषि विभागामार्फत कोणत्या योजनांचा लाभ किंडगीपार गावाला देता येईल याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

सुरेश कन्नाके यांनी कृषि विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याची कार्यपध्दती, आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष, शासन आपल्या दारी उपक्रम व पीएम किसान योजना ई-केवायसी करुन घेण्याचे महत्व याबाबत सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.सय्यद शाकीर अली वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख कृषि विज्ञान केंद्र हिवरा यांनी केले. कार्यक्रमास नाबार्डचे जिल्हा व्यवस्थापक अविनाश लाड, माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी संजय संगेकर, जिल्हा पशुधन अधिकारी कांतीलाल पटले, कृषि अधिकारी पवन मेश्राम, पं.स.सदस्य विद्याकला पटले, किंडगीपारच्या सरपंच लिला उईके, पोलीस पाटील फनिशा सराटे, प्रगतीशील शेतकरी महेंद्र ठाकुर, पुरुष व महिला शेतकरी तसेच किंडगीपार ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विषय विशेषज्ञ विजय कोरे यांनी केले तर उपस्थितांचे आभार मृद शास्त्रज्ञ गणेश खेडीकर यांनी मानले.

## अ.भा.आदिवासी विकास युवा परिषद विदर्भ युवाध्यक्षपदी प्रा. संतोष आत्राम तर कार्याध्यक्षपदी शुभम आत्राम



**गोंदिया:** नाशिक येथे अखिल भारतीय आदिवासी विकास युवा परिषद राष्ट्रीय अध्यक्ष लक्की जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी बैठकीत अखिल भारतीय आदिवासी विकास युवा परिषद विदर्भ युवा अध्यक्ष पदी प्रा. संतोष आत्राम तर विदर्भ कार्याध्यक्ष पदी शुभम चिंतामण आत्राम यांची नियुक्ती करण्यात आली.

या बैठकीला निरज चव्हाण (राष्ट्रीय युवा महानिरीक्षक),अनिल राऊत राष्ट्रीय सोशल मीडिया प्रमुख, गणेश गवळी (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष),आकाश मडावी (महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष), प्रदेश महासचिव दारासिंग पावरा, प्रदेश सल्लागार निलीप गावीत, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष रामा पथवे, कोकण विभाग अध्यक्ष मालू निरगुडे, उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष अशोक जाखेरे उपस्थित होत. यावेळी प्रामुख्याने धीरज सुरत्ने (विदर्भ उपाध्यक्ष),अमन बोरे (विदर्भ सहसचिव), वीरेंद्रकुमार ऊईके (विदर्भ महानिरीक्षक), अतुल कोडापे जिल्हाध्यक्ष (चंद्रपूर),साहिल मडावी जिल्हाध्यक्ष (गोंदिया), कुणाल कोवे जिल्हाध्यक्ष (गडचिरोली ), गणेश बालवंशी (नागपूर जिल्हा कार्याध्यक्ष), सतिश पोर्टेटी (तालुकाध्यक्ष मुलचेरा, गडचिरोली )मयूर कोवे ,सागर इवनातें व महाराष्ट्रातील परिषदेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## नगररचना विभागातील लाचखोर लिपीक अडकला

**गोंदिया :** घर व प्लॉट अकृषक (एनए) करुन देण्यासाठी ३० हजार रुपये घेतल्यानंतर आणखी ५० हजार रुपयांची मागणी केली. यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नगर परिषद कार्यालयातील नगररचना विभागातील वरिष्ठ लिपिकावर कारवाई करुन अटक केली. बुधवारी (दि.२१) ही कारवाई करण्यात आली असून, अब्दुल सलाम वल्द हबीब कुैरेशी (५१, रा.नुरी मस्जीदच्या मागे, सिव्हिल लाइन) असे लाचखोर लिपिकाचे नाव आहे.

सविस्तर असे की, तक्रारदार (३१, रा.गोंदिया ) त्याची आई व बहिणीच्या नावाने नगर परिषद हद्दीतील घराची अकृषक वापराची परवानगी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने रद्द झाली आहे. यावर आरोपी अब्दुल सलाम वल्द हबीब कुरेशी याने घर प्लॉटची गुंठेवारी (एनए) करुन देण्यासाठी ८० हजार रुपयांची मागणी केली. तसेच यातील ३० हजार रुपये घेऊन टाकले व उर्वरित ५० हजार रुपयांची मागणी करीत होता. यावर तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. तक्रारीच्या आधारे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने पडताळणी केली असता अब्दुल सलाम वल्द हबीब कुरेशी याने ३० हजार रुपये घेतल्याचे स्वीकार करुन आणखी ५० हजार रुपयांची मागणी पंचासमक्ष केली. यावर पथकाने बुधवारी (दि.२१) त्याला ताब्यात घेऊन अटक केली आहे. आरोपी विरुद्ध शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## ग्रामपंचायत कार्यालय कुऱ्हाडी

### पंचायत समिती गोरेगाव जिल्हा परिषद, गोंदिया

ग्रामपंचायत कार्यालय कुऱ्हाडी पंचायत समिती गोरेगाव जिल्हा परिषद गोंदिया हे १५ वित्त आयोग निधी अंतर्गत विविध बांधकामे व साहित्य खरेदी करण्याकरिता ई-निविदा सार्वजनिक बांधकाम विभाग जि.प. गोंदिया कडे यथायोग्य श्रेणीत पंजीबद्ध असलेल्या कंत्राटदाराकडून शेकडावारी आनलाईन पद्धतीने मागवित आहे. ई-निविदेचा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या या संकेत स्थळावर दिनांक २४/०६/२०२३ पासून उपलब्ध आहे.


| अ.क्र. | योजनेचे व कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | इसारा रक्कम १% | काम करण्याचा कालावधी | कोरी निविदा किंमत (नापरतावा) | कंत्राटदार नोंदणीचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजा कुऱ्हाडी येथे बंधिस्त नाली बांधकाम व नाली दुरुस्त करणे | ३०००००/- | | ३ महिने | | यथायोग्य |
| २ | रोड साईडला पेव्हार ब्लक लावसो | ३०००००/- | | ३ महिने | | यथायोग्य |
| ३ | शोषखड्डे बांधकाम करणे | १०००००/- | | ३ महिने | | यथायोग्य |
| ४ | सिमेंट रोड दुरुस्ती करणे | १५००००/- | | ३ महिने | | यथायोग्य |
| ५ | हातपंप जवळ पेव्हर ब्लॉक लावणे | १२६७००/- | | ३ महिने | | यथायोग्य |
| ६ | क्लोरीन डोजर मशिन खरेदी करणे | | | | | यथायोग्य |
| ७ | नळ योजना बंद चालू सिस्टम लावणे | ५००००/- | | | | यथायोग्य |
| ८ | आंगणवाडी सोलर संचाद्वारे विदयुत व्यवस्था पंखे, लाईट | १२७७००/- | | | | यथायोग्य |
| एकुण | | १४५०२२६/- | १४५००/- | | १०००/- | |

**कामाचे विवरण (विस्तृत अंदाजपत्रक ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डावर बघायला मिळेल.)**

| | | |
|---|---|---|
| १ | ई-निविदा प्रसिद्धी | २४/०६/२०२३ पासून |
| २ | ई-निविदा दस्ताऐवज डाउनलोड प्रारंभ | २४/०६/२०२३ पासून |
| ३ | ई-निविदा दस्ताऐवज डाउनलोड समाप्त | ०१/०७/२०२३ संध्या.५.०० |
| ४ | ई-निविदा दाखल करण्याची सुरुवातीची दिनांक | २४/०६/२०२३ पासून |
| ५ | ई-निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | ०१/०७/२०२३ संध्या.५.०० |
| ६ | ऑनलाईन निविदा उघडणे | सरपंच/सचिव, ग्रामपंचायत कुऱ्हाडी यांचे कक्षात संबंधित निविदाधारकांचे समक्ष दि.०३/०७/२०२३ स.११.०० वाजता लिफाफा क्र.१ उघडण्यात येईल. (शक्य झाल्यास) |

**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत पंचायत कुऱ्हाडी**

**सरपंच**
**ग्रामपंचायत पंचायत कुऱ्हाडी**



# ओबीसींना आपले हक्क मिळण्यासाठी जातनिहाय जनगणना आवश्यक-भुजबळ

**नवी दिल्ली:-** देशात जातनिहाय जनगणना झाली तरच ओबीसी समाजाला आपले हक्क मिळतील आणि तेव्हाच आपल्या देशाची सहिष्णू, सौहार्दपूर्ण, धम 'निरपेक्ष देश म्हणून प्रतिमा कायम राहील असे सांगत देशात जोपर्यंत जातनिहाय जनगणना होत नाही तोपर्यंत आपला लढा निकराने सुरुठेवावा लागेल असे प्रतिपादन अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ नेते छगन भुजबळ यांनी केले.




देशाचे माजी पंतप्रधान स्व.व्ही.पी सिंह यांच्या जयंतीनिमित्त दिल्लीच्या कॉन्स्टिट्यूशन क्लबमध्ये छगन भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत "सामाजिक न्यायाचा वारसा" हा कार्यक्रम पार पडत आहे. या प्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या सोहळ्याच्या प्रारंभी छगन भुजबळ यांच्यासह मान्यवरांनी देशाचे माजी पंतप्रधान आणि ओबीसींचा मसिहा स्व.व्ही.पी सिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले.

याप्रसंगी जेडीयू खा.गिरिधरी यादव, सीपीआयचे डी राजा, डीएमके खासदार पी विल्सन, ज्येष्ट ओबीसी विचारवंत प्रो.कांचा इलाई, बीएसपी खा.कूनवर दानिश अली, जेएनयुच्या माजी कुलगुरू डॉ.शेफालिका शेखर, कार्यक्रमाचे आयोजक Truth सिकर्स इंटरनॅशनल या संस्थेचे सुनिल सरदार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमप्रसंगी फुले पगडी देऊन छगन भुजबळ यांचा आयोजकांच्या वतीने सन्मान करण्यात आला.

यावेळी छगन भुजबळ पुढे म्हणाले की, व्ही.पी सिंह जयंती साजरी करण्यासाठी आज इथे उभा राहिल्याचा मला अभिमान वाटतो. आज व्ही.पी.सिंह यांची जयंती आहे मात्र त्यांचे योगदान लोकांना का आठवत नाही हा मोठा प्रश्न आहे. मागास समाजातील लोक त्याला का विसरले, हा चर्चेचा विषय असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. देशाच्या पंतप्रधान पदावर स्व. व्ही.पी.सिंह यांनी केवळ ११ महिने कारभार केला. परंतु याच काळात त्यांनी हजारो वर्षांपासून मागासलेल्या लोकांवर होत असलेला अन्याय दूर करण्यासाठी महत्वाची पावले उचलली. त्यांनी ७ ऑगस्ट १९९० रोजी देशात मंडल आयोगाच्या शिफारशी लागू केल्या. त्यामुळे देशातील निम्म्या लोकसंख्येला म्हणजेच ओबीसींना सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण देऊन त्यांनी देशाची आणि समाजाची दिशा कायम स्वरूपी बदलून टाकली आणि भारतातील लोकशाहीचा विस्तार वंचितांपर्यंत पोहोचवला असेही ते म्हणाले.

ते म्हणाले की, मंडल आयोगाच्या अंमलबजावणीनंतर जातीय समीकरणातून देश धुतला जाऊ लागला. त्यावेळी मंडल विरुद्ध कमंडल अशा यात्रा देशात निघाल्या. प्रसंगी केंद्रात पाठिंबा काढल्याने त्यांचं सरकार कोसळलं मात्र बहुजन समाजाच्या हितासाठी त्यांनी त्याची परवा केली नाही. जातीयवादाशी त्यांनी तडजोड केली नाही. मात्र ज्या स्व.व्ही.पी.सिंह यांनी ओबीसी समाजासाठी मोठी किंमत मोजली त्या समाजाकडून मात्र तितका आदर मिळाला नाही अशी खंत त्यांनी यावेळी व्यक्त केली. दि.१० मार्च १९९० रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना भारतरत्न देण्याचा निर्णयही व्ही.पी.सिंग यांनीच घेतला होता हे बहुतेकांना माहीत नसेल याची आठवण त्यांनी उपस्थितांना करुन दिली.

ते म्हणाले की, दि.१६ नोव्हेंबर १९९२ रोजी सवोच्च न्यायालयाच्या नऊ न्यायाधीशांच्या खंडपीठाने मंडल आयोगाला मान्यता दिली.१९७९ मध्ये नियुक्त केलेल्या मंडल आयोगाने ओबीसी लोकसंख्येच्या ५४ टक्के असल्याचा अंदाज वर्तवला आणि पुढील जनगणनेत ओबीसींच्या निश्चित लोकसंख्येसाठी स्वतंत्र डेटा गोळा करण्याची शिफारस केली. देशात मंडल आयोगाच्या शिफारसी लागू करण्यात आल्यानंतर अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने जालना येथे ६ जून १९९३ रोजी ओबीसींचा भव्य मेळावा आयोजित केला. या मेळाव्यात महाराष्ट्रात मंडल आयोग लागू करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार साहेबांनी यांनी मंडल आयोग लागू करण्याचे आश्वासन दिले आणि देशात प्रथमच महाराष्ट्रात मंडल आयोग लागू करण्यात असल्याचे त्यांनी सांगितले.

ते म्हणाले की, हे स्पष्ट आहे की सरकार इम्पेरिकल डेटासाठी सर्व नागरिकांचे जात आणि आर्थिक सर्वेक्षण करण्यास तयार नाही. न्यायालयांनीही राज्यांना अशी जनगणना करण्यास मनाई केली आहे. आता २०३१ पर्यंत जनगणनाही पुढे ढकलण्यात येणार असल्याच्या बातम्या येत आहेत. समतेवर विश्वास ठेवणाऱ्या नागरिकांनी आतापासून आरक्षणविरोधी लोकांबरोबर संघर्ष करावा लागणार आहे. संपूर्ण देशात जातनिहाय जनगणना झाली पाहिजे, ही मागणी पूर्ण होईपर्यंत हा लढा निकराने सुरू ठेवावा असे आवाहन त्यांनी केले.

# चार राज्यस्तरीय पथकांचा गोंदिया जिल्ह्यात ठिय्या, १७७ धान खरेदी केंद्रांची तपासणी

**गोंदिया :-** यावर्षी धान खरेदीतील घोटाळे रोखण्यासाठी पणन महासंघाकडून पावले उचलण्यात आली आहेत. धान खरेदी केंद्रांची सातत्याने तपासणी केली जात आहे. गोंदिया जिल्ह्यातील १७७ केंद्रांची तपासणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मुंबई तर्फे ४ भरारी पथके पाठविण्यात आली आहेत. चार उड्डाण पथकांचे पथक १७७ केंद्रांची तपासणी करत आहेत. जिल्ह्यात पणन महासंघ व आदिवासी विकास महामंडळाकडून धान खरेदी करण्यात येत आहे. जिल्ह्यात जिल्हा मार्केटिंग फेडरेशनने १७७ केंद्रांना मान्यता दिली आहे.



शासनाच्या नियमानुसार आधारभूत किमतीवर अधिकृत धान खरेदी केंद्रांवरून धानाची खरेदी केली जाते. केंद्रांद्वारे खरेदी केलेला धान महामंडळाकडून राईस मिलर्सना वाहतुकीसाठी दिला जातो. गेल्या काही वर्षांपासून जिल्ह्यातील धान खरेदी केंद्रांवर मोठ्या प्रमाणात खरेदी केलेल्या धानाचा गंडा घातल्याचे प्रकरण समोर आले. यापूर्वीच्या हंगामात धान खरेदीनंतर अनेक गोदामांत धानच नसल्याचे दिसून आले होते. त्यामुळे संस्था दोषी आढळल्यामुळे काही केंद्रांवर फौजदारी कारवाई करण्यात आली तर काही केंद्रांवरुन नुकसानीची रक्कमही वसूल करण्यात आली.जिल्हा पणन संघामार्फत सध्या रब्बी हंगामात गोंदिया जिल्ह्यातील १७७ केंद्रांवर धान खरेदी करण्यात येत आहे. त्यानुसार भविष्यात घोटाळे टाळण्यासाठी दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. मार्केटिंग फेडरेशन मुंबई मार्फत केंद्रांवर लक्ष ठेवले जात आहे. जिल्ह्यातील केंद्रांची तपासणी करण्यासाठी राज्यस्तरावरून ४ उड्डाण पथके जिल्ह्यात पाठविण्यात आली आहेत. जिल्ह्यात दाखल होणारी चारही उड्डाण पथके आपापल्या केंद्रांची तपासणी करत आहेत. उड्डाण पथकाची तपासणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर केंद्रनिहाय अहवाल महासंघाला सादर केला जाईल. त्यामुळे उड्डाण पथकाच्या देखरेखीखाली जिल्ह्यातील धान खरेदी आणि मध्यवर्ती धानसाठ्यात आणखी घोटाळे समोर येणार का, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## हयगयीने वाहतूक चालविणाऱ्या विरुध्द जिल्ह्यांत मोहीम-पोलीस अधिक्षक पिंगळे

**गोंदिया:-** शहरासह जिल्ह्यात अपघाताचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन नागरिकांमध्ये वाहतुक नियमांची जनजागृती व्हावी, शिस्त लागावी, वाहतूक व्यवस्था सुरळीत व्हावी व हयगयीने वाहन चालविणाऱ्या विरुध्द कारवाई करण्यासाठी जिल्ह्यांत मोहीम राबविण्याचे निर्देश पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे यांनी पोलिस अधीक्षक कार्यालयात २३ रोजी आयोजित बैठकीत दिले. या अनुषंगाने शनिवार, रविवारी ही मोहिम राबविण्यात येणार आहे. बैठकीला अप्पर पोलिस अधिक्षक अशोक बनकर, गोंदियाचे उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील ताजणे आदी अधिकारी उपस्थित होते.



जिल्ह्यात हयगयीने, लापरवाहीने बेदर्कारपणे वाहन चालवून स्वतः व लोकांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या विरुद्ध कारवाईची धडक मोहीम राबविण्याचे निर्देश सर्व पोलिस ठाणे प्रमुख, जिल्हा वाहतूक नियंत्रण शाखेला दिले. मोहीम दर शनिवार आणि रविवारला राबविण्यात येणार आहे. मोहिमेच्या अनुषंगाने जिल्ह्यात वाहतूक नियमांचे पालन करण्यासोबतच जनजागृती करणे, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणारे, बेशिस्त वाहन चालविणाऱ्या विरोधात कठोर कारवाई केली जाणार आहे.

## सालेकसात बाजार समिती स्थापन करा

**सालेकसा:** शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला शेतमाल विक्री करण्यासाठी बाजार समिती प्रमुख घटक आहे. मात्र, स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही जंगलव्याप्त सालेकसा तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीसाठी पायपीट करावी लागत आहे. बाजार समिती अभावी शेतकऱ्यांना त्यांचा शेतमाल अल्प किमतीत विकावा लागतो. शेतकऱ्यांच्या हितासाठी सालेकसा येथे कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन करण्याची मागणी तालुक्यातील शेतकऱ्यांनी जिल्हा उपनिबंधक यांच्यामार्फत शासनाला पाठविलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.



सालेकसा येथे कृषी उत्पन्न बाजार समिती नसल्यामुळे शेतकऱ्यांना अल्प किमतीत शेतमाल विकावा लागतो. बाजार समिती अभावी शासनाच्या विविध योजनाचा लाभ देखील शेतकऱ्यांना घेता येत नाही. अल्प किमतीत शेतकऱ्यांना त्यांनी उत्पादीत केलेला शेतमाल विक्री करावा लगतो. सालेकसा तालुका आदिवासी, दुर्गम, जंगलव्याप्त नक्षलग्रस्त आहे. तालुक्यात ४१ ग्रामपंचायती व ९२ गावांच समावेश आहे. शासनाचे धोरण शेतकरी हिताचे असले तरी दुसरीकडे तालुक्यात बाजार समिती नसल्याने शेतकऱ्यांची बोळवण होत आहे. तालुक्यात ९० टक्के लोक शेती करुन उपजिवीका करीत आहेत. शेतकऱ्यांना शेतमाल विक्री करण्यासाठी ३० ते ५० किमी अंतरावरील आमगाव कृषी उत्पन्न बाजार समिती गाठावी लागते. यात शेतकऱ्यांना शारीरिक, मानसिक त्रासासह आर्थिक भुर्दंडही बसतो. शेतकऱ्यांचा त्रास टाळण्यासाठी व त्यांच्या उत्पादित मालाला योग्य दर मिळण्यासाठी सालेकसा येथे कायमस्वरूपी कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. या आशयाचे निवेदन जिल्हा उपनिबंधकांना देण्यात आले. निवेदन देताना ब्रजभूषणसिंग बैस, हिरालाल साठवणे, घनश्याम बहेकार, यशवंत शेंडे, बाजीव तरोणे, माधवराव खोटेले, एकनाथ हत्तीमारे, गुलाब मदनकर, नरेश कावरे, बाबूलाल कटरे, अविनाश टेंभरे, किसन रहांगडाले, बाबुलाल कटरे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

## खा.प्रफुल्ल पटेल २९ व ३० रोजी विदर्भात

**गोंदिया:** खासदार प्रफुल्ल पटेल यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षपदी काही दिवसांपुर्वीच नियुक्ती करण्यात आली. या पदाचा पदभार सांभाळल्यानंतर खासदार पटेल हे प्रथमच विदर्भ दौऱ्यावर येत आहेत. २९ व ३० जून रोजी नागपूरसह गोंदिया, भंडारा या तिन्ही जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे आयोजित विविध कार्यक्रमात ते उपस्थित राहणार आहेत. प्रथम आगमनानिमित्त गोंदिया, भंडारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे सत्कार समारोहाचेही आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष खा.पटेल हे २९ व ३० रोजी विदर्भाच्य दौऱ्यावर येत आहेत. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे गोंदिया व भंडारा या दोन्ही जिल्ह्यात सत्कार समारोहाचे आयोजन करण्यात आले आहे. खा.पटेल हे ३० जून रोजी भंडारा व गोंदिया या दोन्ही जिल्ह्यातील आयोजित सत्कार समारोहात उपस्थित राहणार अहेत.



## आत्मसमर्पित नक्षलवादी करणार चित्रपटात अभिनय, तृप्ती भोईर यांनी घेतली "ऑडिशन"



**गडचिरोली :** आदिवासी समाजात असलेल्या ङ्कुर्माघरफ प्रथेवर आधारित चित्रपटात आता आत्मसमर्पित नक्षलवादीही अभिनय करणार आहे. त्यासाठी या चित्रपटाच्या निर्मात्या अभिनेत्री तृप्ती भोईर यांनी त्यांना संधी देण्यासाठी शनिवारी नवजीवन वसाहतीत जाऊन त्यांची "ऑडिशन' घेतली. गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी महिलांना मासिक पाळीदरम्यान घरात न राहता गावाच्या एका कोपऱ्यात बांधलेल्या कुर्माघर नावाच्या झोपडीत वास्तव्य करावे लागते. या प्रथेवर प्रकाश टाकणा?्या कुर्माघर नावाच्या चित्रपटाची निर्मिती गडचिरोलीत केली जात आहे.

"अगडबम, टुरिंग टॉकिज, नमस्कार जयहिंद, तुझ्या माझ्या संसाराला आणखी काय हवे', अशा अनेक चित्रपटांची निर्मिती करणाऱ्या तृप्ती भोईर यांनी स्थानिक कलावंतांना या चित्रपटात संधी देण्याचे ठरविले.

दरम्यान आत्मसमर्पित नक्षलवाद्यांना स्वतःची नवीन ओळख मिळावी यासाठी त्यांनाही या चित्रपटात संधी द्यावी, अशी सूचना पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी केली. त्यानुसार तृप्ती भोईर व विशाल कपूर यांनी शनिवारी नवजीवन वसाहतीत जाऊन आत्मसमर्पित पुरुष व महिला नक्षलवाद्यांची "ऑडिशन' घेतली. यावेळी त्यांना अभिनय व आवाजाबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) कुमार चिंता, आत्म समर्पण शाखेचे प्रभारी अधिकारी पो. उपनिरीक्षक सागर झाडे व अंमलदार उपस्थित होते.

# लिलाव घाटातील रेतीवर तस्करांचा डल्ला

### जिल्ह्यात चोरीची बिकट समस्या: महसूल व खनिकर्म विभागाचे दुर्लक्ष

**तिरोडा:** तालुक्यात अनेक रेती घाटांचा समावेश आहे. यपैकी काही घाट लिलाव झाले आहेत. लिलाव झालेल्या घाटातून ९ जुनपर्यंत रेती काढण्याची परवानगी होती. महसूल बुडू नये, म्हणून तालुक्यातील किरकोळ रेती चोरीवर करडी नजर ठेवली जाते. परंतु लिलाव झालेल्या घाटातून संगनमत करुन मोठ्या प्रमाणात रेती उत्खनन करुन डल्ला मारला जात आहे. याकडे मात्र, महसूल व खनिकर्म विभागांकडून डोळेझाकपणा केला जात आहे.

विहित मुदत संपून देखील नदीपात्रातून रेती चोरुन दरोडा टाकला जातो. सध्या हे तालुक्यात कार्य युद्ध पातळीवर सुरु आहे. सरकारने रेती साठवण्यासाठी कंत्राटदारांना विहित गट मंजूर करुन दिला होता. त्या गटाव्यतिरिक्त अन्य दुसऱ्या गटामध्ये रेती ठेवली जात आहे. यामुळे शासनाचा गौण खनीज महसूलाच्या तिजोरीवर विपरित परिणाम होत आहे. दिवसाढवळ्या रेतीची वाहतूक सुरुच आहे. इतकेच नव्हे रात्री देखील ट्रक, टिप्परने रेती वाहतूक करण्यात येत असल्याचे जनसामान्यांत बोलले जात आहे. याकडे महसूल विभाग, खनिकर्म विभाग व जिल्हाधिकारी कार्यालयाचे कर्मचारी दुर्लक्ष करीत आहेत.

उल्लेखनीय असे की, शासकीय घरकुलाचे बांधकाम करण्यासाठी बैलबंडीने रेतीची वाहतूक करणाऱ्यांवर तिरोडा येथे निर्बंध लावले जातात. मात्र, मोठ्या प्रमाणात नदीतून वाहनांतून वाहतूक करणाऱ्यांना सुट का? असा सवाल जनतेने उपस्थित केला आहे. १० जूनपासून तिरोडा तालुक्यात रेती चोरीचे सत्र जोमाने सुरु आहे. तरी शासन, प्रशासन गप्प आहेत. नमूद घाटातून निर्धारित केलेली रेती काढणे वैध मानली जाते. मात्र, त्यापेक्षा जास्त रेती काढून कंत्राटदाराकडून शासनाची दिशाभूल केली जाते. लिलावात निर्धारित ब्रास रेती प्रमाणे जेवढा महसूल जमा केला जातो. त्यापेक्षा मोठ्या प्रमाणात रेती चोरी केली जाते. याची माहिती गावकऱ्यांनी दिली तर, त्यांना उडवाउडवीची उत्तरे देवून कंत्राटदाराला पाठीशी घालण्याचे कार्य सुरु आहे. यावर योग्य भूमिका घेऊन खनिकर्म विभाग, महसूल विभाग, वाहतूक नियंत्रण विभाग यांना वरिष्ठांनी निर्देश द्यावे, अशी मागणी सर्वसामान्य जनतेची आहे.



# जंगलात पुष्पा गँग सक्रिय

**सडक अर्जुनी:** संरक्षित राखीव जंगलातून गेल्या पंधरवाड्यात टायगर मॉनिटरिंग टॅप कॅमेरा चोरीला गेला. काही दिवसांपासून लाकडांची तस्करी देखील होत असल्याच्या तक्रारी येऊ लागल्या आहेत. त्यातच पुन्हा सडक अर्जुनी वन परिक्षेत्रात येत असलेल्या पांढरवाणी बिटातून सागवन वृक्षांची अवैध वृक्षतोड करण्यात येत असल्याचे पुढे आले आहे. यावरुन संरक्षित राखीव जंगलात अद्यापही पुष्पा गँग सक्रिय असल्याचे दिसून येत आहे. सडक अर्जुनी वन परिक्षेत्रांतर्गत येत असलेल्या शेंडा सहवन क्षेत्रातील पांढरवानी बिटात पी.एफ.६७१ ला लागूनच पांढरवानी येथील शेतकरी शैलेश मदनलाल उईके, हौसलाल धनलाल नागपुरे यांची शेती आहे. सध्या शेतीचे हंगाम सुरु आहे. शेतीचे कामे करण्यासाठी कातलवाई (रिठी) पांढरवाणी येथील आपल्या शेतात गेले असता त्यांच्या शेतीला लागून संरक्षित राखीव जंगलात अवैध वृक्षतोड करण्यात आल्याचे त्यांच्या निदर्शनास आले आहे. यावर त्यांनी पाहणी केली असता तस्करांकडून सागवन वृक्षाची कत्तल करण्यात आली असल्याचे दिसून आले.



या प्रकरणाची तक्रार त्यांनी शेंडाचे क्षेत्र सहायक यांच्याकडे केली. यावर क्षेत्र सहायक यांनी मौका तपासणी करुन याची नोंद केली आहे. मात्र, कोणती कारवाई करण्यात आली, हे अद्यापही गुलदस्त्यात आहे. विशेष म्हणजे, सडक अर्जुनी वनपरिक्षेत्रात मोठ्या प्रमाणात अवैध वृक्षतोडीचे प्रमाण वाढले आहे.

अवैध वृक्षतोडीची चर्चा संपूर्ण वनपरिक्षेत्र गाजत आहे. याकडे वरिष्ठ वन अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे. परिणामी, वनतस्कर खुलेआम संरक्षित राखीव जंगलातील मौल्यवान लाकडांची वृक्षतोड करीत अहेत. या वनतस्करांना वनविभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे वरदहस्त असल्याचे बोलल्या जाते. त्यामुळेच सद्या संरक्षित जंगलात पुष्पा गँग सक्रिय असल्याचे परिसरात बोलले जात आहे.

# २६ जून:अमली पदार्थ विरोधी दिवस



देशाचे भविष्य असलेली आजची युवा पिढी ही अमली पदार्थ सेवनाच्या आहारी जात आहे. हे आपण दररोज कुठल्या वृत्तपत्रातून तर कुठल्या वृत्त वाहिण्यातून वाचत ऐकत असतो. आज पालकांना आपल्या पाल्यांना अमली पदार्थाच्या सेवनापासून कसे वाचवावे, हा प्रश्न निर्माण झाला आहे. मोठ्या प्रमाणात देशातील युवा पिढीला अमली पदार्थाच्या विळख्यातून कसे मुक्त करता येईल यासाठी शासन गंभीर आहे.

देशाच्या सीमेवरून, सागरी मार्गाने व प्रसंगी हवाई मार्गाने अमली पदार्थ छुप्या पद्धतीने देशात येत असल्याचे चित्र आपण विविध ठिकाणी केलेल्या कारवाईवरुन बघत असतो. सीमेवर भारतीय सैन्य, समुद्र मार्गावर तटरक्षक दल व विमानतळावर सुरक्षारक्षकांनी मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ पकडल्याच्या बातम्या देखील आपण वाचत असतो. अमली पदार्थावर शासनाने बंदी घातली आहे. देशाच्या सीमाच काय तर जिल्ह्यातसुद्धा अमली पदार्थाची तस्करी, सेवन व लागवड होणार नाही यासाठी जिल्हा प्रशासन विविध यंत्रणांना सोबत घेऊन काम करताना दिसते.

आजची युवा पिढी व्यसनाच्या आहारी जाणार नाही यासाठी अमली पदार्थाच्या सेवनाच्या दुष्परिणामाची माहिती शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देऊन जनजागृती करण्याचे काम करण्यात येत आहे. २६ जून हा जागतिक अमली पदार्थ विरोधी दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवसाचे औचित्य साधून युवा वर्गामध्ये अमली पदार्थविरोधी जागरुकता निर्माण करण्यात येते. भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद ४७ मध्ये सार्वजनिक आरोग्य आणि नागरिकांच्या आरोग्य रक्षणासाठी मादक पदार्थावरील बंदीची मार्गदर्शक तत्वे समाविष्ट केली आहे.

महाराष्ट्राने आपले व्यसनमुक्ती धोरण निश्चित केले आहे. १७ ऑगस्ट २०११ च्या शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्राचे व्यसनमुक्ती धोरण जाहीर केले आहे. सन १९८७ पासून संयुक्त राष्ट्र संघाने अमली पदार्थ हा महत्त्वाचा विषय मानला आहे. देशात नार्कोटिक्स ड्रग्स अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्स ॲक्ट १९८५ (एन.डी.पी.एस) हा अमली पदार्थ विरोधी कायदा केला आहे. सन १९६१ मध्ये पहिले अमली पदार्थावर आधारित संमेलन झाले. अवैध सायकोट्रापिक पदार्थावर आधारित दुसरे संमेलन सन १९७१ मध्ये झाले. सन १९८८ मध्ये गैरकानुनी व्यवसाय विरोधात तिसरे संमेलन झाले.

एनडीपीएस ॲक्ट १९८५ या अमली पदार्थ विरोधी कायद्यांतर्गत अमली वस्तू किंवा औषधांचे उत्पादन, वितरण, सेवन, विक्री करणे, त्याची वाहतूक करणे, त्याचा साठा करणे, त्याचा वापर करणे व त्याची आयात निर्यात करणे यावर भारतात बंदी आहे.

अमली पदार्थाच्या विरोधात प्रत्येक युवक युती नागरिक व पालकांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग विविध कार्यक्रम व उपक्रमांचे आयोजन करीत असतो. अमली पदार्थ त्यालाच म्हणतात, ज्या पदार्थाच्या सेवनामुळे माणसाला गुंगी, नशा किंवा धुंदी येते. अफु व त्यापासून मॉर्फिन, हेरॉइन तसेच कोकेन, भांग, गांजा व चरस या पदार्थाचा अमली पदार्थात समावेश केला जातो. ब्राऊन शुगर व स्पिरिटचाही नशेसाठी वापर केला जातो. सिंथेटिक व एमडीचा (मेफेड्रॉन) नशेसाठी श्रीमंत लोक वापर करू लागले आहे. तसेच एलसीडी, मारीजुआना, म्याव- म्याव, डरनेक्स, शीलावती, मॅजिक मश्रुम, वेदनाशामक गोळ्या, व्हाइटनर व काही औषधांचाही वापर नशेसाठी करण्यात येतो. भारतात अमली पदार्थ वापरणे, त्याचे सेवन करणे हा गुन्हा आहे. किती दंड करावा हे त्याच्या वापरावर अवलंबून आहे.

एखादा व्यक्तीला अमली पदार्थ बाळगल्यासाठी किंवा सेवन केल्यामुळे शिक्षा झाली असेल आणि त्या व्यक्तीला अमली पदार्थाच्या सेवनाच्या विळख्यातून मुक्त व्हायचे असेल अर्थात त्याला सुधारण्याची इच्छा असेल तर तो व्यक्ती एखाद्या व्यसनमुक्ती केंद्रात जाऊन उपचार घेऊ शकतो.त्याने जर उपचार मध्येच थांबवले आणि पुन्हा अमली पदार्थाच्या सेवनाकडे वळला तर त्याला पुन्हा शिक्षा होऊन शकते.

अमली पदार्थ सेवनाचे प्रमाण शहरी भागात ग्रामीण भागापेक्षा जास्त आहे. शहरी भागात झोपडपट्ट्या, समुद्रकिनाऱ्यावरील झोपडपट्ट्या, मोठ्या उड्डाण पुलाच्या खाली वस्त्यांमध्ये नशा करणारे टोळके दिसून येतात. तसेच गुन्हेगारी विश्वातील लोकसुद्धा अमली पदार्थाचे सेवन करतात. नशा आणणारे अमली पदार्थ खरेदी करण्यासाठी चोरी, लूटमार व महिलांच्या गळ्यातील दागिने हिसकवून आपले अमली पदार्थ सेवनाची नशा ते पूर्ण करतात.

आज तर श्रीमंत घरातील लोकसुद्धा अमली पदार्थ सेवनाच्या आहारी गेल्याचे दिसून येत आहे. केवळ उत्सुकतेपोटी अमली पदार्थाची चव चाखणारेसुद्धा अमली पदार्थ सेवनाच्या विळख्यात सापडले आहे. अभ्यास करताना झोप येऊ नये, यासाठी मुले - मुली अमली पदार्थाच्या आहारी गेले आहे. आज अमली पदार्थ सेवनाच्या आहारी गेलेल्या युवा पिढीला या गर्तेतून बाहेर काढणे आज काळाची गरज आहे.

भारतात तर पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ, भूतान व अफगाणिस्तान सीमेतून चोरट्या मार्गाने अमली पदार्थ पाठविले जातात. नायजेरियातूनसुद्धा मोठ्या प्रमाणात अमली पदार्थाची भारतात तस्करी केली जाते.अमली पदार्थ सेवनाच्या आहारी गेलेल्या व्यक्तीच्या वर्तणुकीत अचानक बदल दिसून येतो. मुले जर अमली पदार्थाच्या आहारी गेली तर अभ्यास, खेळ व अन्य कार्यक्रमात त्यांचे मन रमत नाही. शाळेच्या उपस्थितीवर देखील त्यांच्या परिणाम होतो. पैसे मिळण्यासाठी पालकांकडे ती सातत्याने मागणी करतात. घरातील वस्तूंची ते चोरी करण्यास मागेपुढे पाहत नाही. डोळे लाल, निस्तेज होणे, डोळ्याखाली सूज येणे, बोलताना अडखळणे, उभे राहण्यासाठी त्रास होणे, भूक न लागणे, वजन कमी होणे, निद्रानाश, कपड्यांबद्दल व व्यक्तिगत स्वच्छतेबद्दल बेफिक्रेने वागतात. व्यसनाचा परिणाम व्यक्तीच्या फुफ्फुस आणि स्मरणशक्ती होतो. अवयव निकामी होतात. व्यक्तींमध्ये अस्वस्थता व मानसिक आजार वाढतात.

आपल्या पाल्याना लागलेल्या अमली पदार्थाच्या सेवनाला आळा घालण्यासाठी पालकांनी आपल्या पाल्यांना समजून घेणे महत्त्वाचे आहे. पालकांनी त्यांच्याशी मित्र म्हणून वागले पाहिजे. चांगले काय आणि वाईट काय या गोष्टी मित्रत्वाच्या नात्याने त्यांना पटवून दिल्या पाहिजे. त्यांना विश्वासात घेऊन त्यांच्याशी प्रेमाने वागून प्रेमाची वागणूक दिली पाहिजे. वेळीच त्यांची वाईट मित्रांपासून संगत तोडली पाहिजे. शाळेत शिक्षकांनी मुलाला कमी लेखले तर मुले व्यसनाकडे वळतात. मानसोपचार तज्ञांकडून मुलांचे समुपदेशन केले पाहिजे. मानसोपचार तज्ञांच्या मते अमली पदार्थाचे सेवन हा एक मानसिक आजार असून त्याचा वाईट परिणाम हा त्या व्यक्तीच्या आयुष्यात होतो. सोबतच कुटुंब आणि समाजावर देखील होत असतो.

सर्व व्यसनांवर निश्चितच उपचार आहे. अमली पदार्थांच्या व्यसनातून सहजपणे बाहेर येण्यासाठी मानसोपचार तज्ञांचा सल्ला घेतला पाहिजे. प्रत्येकाने अमली पदार्थापासून दूर राहिले पाहिजे. मनुष्य जीवन हे सुंदर आहे. कारण ते एकदाच मिळत असते. त्यामुळे हे जीवन सुंदर बनविण्यासाठी आरोग्याला महत्त्व देणे आवश्यक आहे.

**विवेक खडसे**
जिल्हा माहिती अधिकारी वाशिम